मराठे प्रतिष्ठान मुंबई यांचे मुखपत्र

परस्परं भावयन्तः

म प्र

# हितगुज

**अंक ३८ ● संपादक : लक्ष्मण शंकर (पृष्ठ ५२०) ● जून १९९९**

(व्यक्तींची नावे देताना 'मराठे' आडनाव वगळले असून कंसात कुलवृत्तांतातील माहितीचा पृष्ठ क्रमांक दिला आहे.)

**(फक्त खाजगी वितरणासाठी)**

## प्रतिष्ठानच्या अनौपचारिक शाखा

***(डोंबिवली मेळाव्यांतले प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुरेशभाऊंचे भाषण : २४-४-१९९९)***

कुलबंधु-भगिनींनो,

प्रकृती अस्वास्थ्यामुळे मला व्यक्तिशः या मेळाव्याला, इच्छा असूनसुद्धा, उपस्थित रहाता येत नाही याबद्दल वाईट वाटते.

दोन महिन्यांपूर्वी असाच मेळावा बोरिवली येथे आयोजित केला होता. त्याला अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला. मेळाव्याचा क्षेत्रविस्तार मर्यादित असल्यामुळे उपस्थितांमधील परस्पर संबंध दृढ होतात. वैयक्तिक पातळीवर नव्या ओळखी होतात. 'अरे, तुम्ही इतक्या जवळ राहता?' या प्रश्नापासून बऱ्याच वेळा गप्पांना सुरवात होते. विचारांची, अनुभवांची देवाण-घेवाण होण्यासाठी एक व्यासपीठ आपोआप तयार होते.

माझी आपणाला एक विनंती आहे. **हे व्यासपीठ फक्त मेळाव्याच्या निमित्तापुरतं न होता ते एक कायमचं संकेत स्थळ बनावं. अशी छोटी छोटी स्नेहकेंद्रे आपल्या प्रतिष्ठानच्या अनौपचारिक शाखाच बनतील** आणि अशा रेशमी बंधांनी रचलेला प्रतिष्ठानच्या कार्याचा डोलारा आपला विश्वास बसणार नाही एवढ्या कमी अवधीत उभा राहील.

या मेळाव्याची काही खास वैशिष्ठ्ये आहेत. प्रतिष्ठानचे खंदे कार्यकर्ते श्री. अशोक मराठे हे व्यवसाय मार्गदर्शन करणार आहेत. प्रतिष्ठानच्या उद्योग प्रेरणा या उपक्रमाचे निमंत्रक श्री. हेमंत मराठे आपल्याला सदर उपक्रमाची माहिती देणार आहेत.

अशा या अपूर्व संधीचा फायदा मला स्वतः उपस्थित राहून घेता येत नसला तरी या पत्रकाद्वारे मी आपणा सर्वांचे स्वागत करतो आणि वरचेवर असेच स्नेहमेळावे आयोजित करण्यात येवो अशी शुभेच्छा व्यक्त करतो.

### खुषीपत्र

हितगुज सप्टेंबर १९९८च्या अंकांतील सौ. कुंदा गणात्रा यांचा कॉन्टॅक्ट लेन्सवरील लेख व त्यांची या अंकातील जाहिरात वाचली. त्या शुक्रवार, शनिवार पुण्यात असतात ती संधी साधून मी त्यांच्याकडून डोळे तपासून आले. त्यांनी डोळे अतिशय व्यवस्थित तपासले आणि चष्म्याचा नंबरहि काढून दिला. डोळे तपासणीचे काम मोफत केले. याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

**- सौ. नीलांबरी रमेश (पृ.२८०), पुणे.**

### प्रतिसाद

**- राजा मराठे** (राजाराम नारायण,पृ.२३५), मालाड, मुंबई (फोन:३६९ ९०००)

फेब्रुवारीमध्ये १३ तारखेला बोरीवली येथे झालेल्या विभागीय मेळाव्यास आम्ही हजर होतो. मेळाव्यास मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहून मोठं समाधान वाटलं. कुटुंबातील पुसट होत चाललेल्या सीमारेषा अशा मेळाव्यातून अधिक स्पष्ट होण्यास मदत होईल असा विश्वास वाटतो.

आज जवळ जवळ १२/१३ वर्षे मी प्रतिष्ठानच्या कामापासून दूर आहे. घरातील अडचणी, माझी प्रकृती व गाडीचा प्रवास हे लक्षात घेता आजपर्यंत मी कोणताही संपर्कपण ठेवला नाही. परंतु आज लक्षात आलं की घरातील या साऱ्या अडचणी सांभाळून काही करता आलं तर पहावं म्हणून थोडं विस्तारानं लिहिण्याचा प्रयत्न करीत आहे.

काळाला अनुसरून प्रतिष्ठानचे मुखपत्र 'हितगुज' मधे क्रमाक्रमाने होणारा बदल निश्चितच स्वागतार्ह आहे. हितगुजचं बाह्यरंग-अंतरंग आता प्रिंटिंग व्यवसायामधील नवीन सुधारणा लक्षात घेता अधिकच नेटकं करण्याचा प्रयत्न करायला काय हरकत आहे? ***(राजभाऊ, आमची पण अशीच उत्कट इच्छा आहे. आपल्या उत्स्फूर्त देकाराबद्दल मनापासून आभार-संपादक)***

**मराठे प्रतिष्ठान**

**पब्लिक ट्रस्ट नोंदणी क्र. ई. ७९१८ (मुं. ता. १२/१/१९८१)**

**मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५. दूरध्वनी : ४३०२४५३.**

Marathe Pratishthan

# प्रतिष्ठान वृत्त

***कार्यकारी मंडळ सभा :***

कार्यकारी मंडळ आणि १६व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत नियुक्त केलेल्या समित्या यांचेमधे सतत परस्पर संपर्क व्हावा आणि त्यांचे काम गतिमान व्हायला मदत व्हावी या दृष्टीने महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी कार्यकारी मंडळाची सभा आणि चौथ्या शनिवारी कार्यकारी मंडळ व समित्यांचे निमंत्रक यांची संयुक्त सभा घेण्याचे आता ठरविण्यात आले आहे. त्यानुसार मागील तिमाहीत मार्च १३, एप्रिल १० व मे ८ रोजी कार्यकारी मंडळाच्या सभा झाल्या. विश्वस्त, कार्यकारी मंडळ व समित्यांच्या निमंत्रकांची सभा २७ मार्च रोजी झाली. २४ एप्रिल रोजी डोंबिवली येथे कुलबांधवांचा विभागीय मेळावा असल्यामुळे संयुक्त सभा झाली नाही. मात्र २२ मे रोजी कार्यकारी मंडळ व समित्यांचे निमंत्रक यांची संयुक्त सभा झाली. समित्यांचे कामकाजाची कल्पना विविध समित्यांच्या निमंत्रकांनी या अंकात प्रसिद्ध केलेल्या मनोगत-आवाहनावरून येईलच.

**डोंबिवली मेळावा : २४.४.१९९९**

परस्पर सहकार्यातून परस्पर सहाय्य व विचारांची देवाण-घेवाण साधण्यासाठी सुरवातीला परस्पर परिचय तरी व्हावा म्हणून विभागीय मेळावे आयोजित केले जातात. यांमधून विभागवार मराठे प्रतिष्ठानची अनौपचारिक स्नेहकेंद्रे निर्माण व्हावी अशी अपेक्षा आहे.

ठाणे ते कर्जत या भागांत राहणाऱ्या कुलबांधवांचा मेळावा डोंबिवली येथे दि. २४-४-१९९९ रोजी आयोजित करण्यात आला होता. मेळाव्याला सुमारे ५० कुलबांधव उपस्थित होते. त्यात महिलांची उपस्थिती लक्षणीय होती. त्यांचा सहभागहि चांगला होता.

प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुरेशभाऊ प्रकृति अस्वास्थ्यामुळे उपस्थित राहू शकले नाहीत. त्यांचे भाषण सुरवातील वाचून दाखवण्यांत आले. सभेचे ***अध्यक्षस्थान डोंबिवलीनिवासी प्रतिष्ठानचे विश्वस्त श्री. अरविंद दामोदर*** *(पृ.२९२)* ***यांनी स्वीकारले.***

या मेळाव्यांत डोंबिवलीचे रहिवासी सफल व्यावसायिक ***श्री. अशोक यशवंत (पृ.३२१) यांनी प्रमुख भाषण केले.*** त्यांनी आपला स्वतःचा अनुभव कथन करतांना सांगितले की पहिली ५ वर्षे खूप परिश्रम करायची तयारी असेल तर एकूण १० वर्षांत कोणत्याही धंद्यात पूर्णपणे स्थिरावतां येते. यासाठी चार प्रमुख गोष्टी लागतात. त्या म्हणजे बुद्धिमत्ता, सचोटी व प्रामाणिकपणा, पैसा आणि नशीब. या चारपैकी बुद्धिमत्ता, सचोटी व प्रामाणिकपणांत मराठे कुलबांधव मुळीच कमी पडणार नाहीत. पैशावाचूनहि फारसे अडत नाही. तो मिळवतां येतो. नशिबाचा थोडासा भाग असला तरी त्याचा बाऊ न करतां अगदी सुरवातीपासूनच नीट नियोजन करून आपले उद्दिष्ट ठरवून शिस्तबद्ध प्रयत्न केले तर नशीब आड येत नाही असेही त्यांनी सांगितले.

प्रतिष्ठानच्या **उद्योग प्रेरणा समितीचे निमंत्रक हेमंत महादेव (पृ.४७१),** यांनीही सांगितले की लहान-लहान व्यवसायहि खूप किफायतशीर होऊ शकतात. सगळेच काही टाटा-बिर्ला होऊ शकत नाहीत. मुख्य म्हणजे लोकांची गरज काय ते हेरून व्यवसाय सुरू करायला हवा. प्रतिष्ठानच्या उद्योग प्रवर्तन निधीसाठी रद्दी विक्रीचे पैसे सुमारे ५०० कुटुंबांनी द्यायचे ठरविले तरी वर्षाकाठी सुमारे १ लाखाचा निधी उभा होऊ शकेल असे त्यांनी सांगितले.

या संदर्भातल्या चर्चेत मराठे प्रतिष्ठानची अनौपचारिक क्रेडिट सोसायटी असावी असाहि विचार मांडण्यात आला.

मराठे कुटुंबातली विशेषतः तरुण मंडळी अजूनहि प्रतिष्ठानकडे मोठ्या प्रमाणात का आकर्षित होत नाहीत याचा विचार करायला हवा असे **लक्ष्मण शंकर** (पृ.५२०), **हितगुजचे संपादक,** यांनी सांगितले. तरुणांना या बाबतीत 'मोटिव्हेट' करण्यांत आपण वडीलधारी मंडळीच कमी पडतो का याचाहि विचार करावा लागेल असेहि त्यांनी सांगितले.

आपल्या अध्यक्षीय समारोपांत **श्री. अरविंदरावांनी** अशी सूचना केली की गावागावातील मराठे कुटुंबात परस्पर परिचय वाढवण्याचे कार्य महिला वर्ग प्रभावीपणे करू शकेल. त्यांनी हळदीकुंकू, गौरी-गणपती, दिवाळी-दसरा अशा सण-समारंभाचे निमित्त साधून एकत्र येण्याला सुरवात करावी.

या मेळाव्यामधे प्रतिष्ठानचे पूर्व कोषाध्यक्ष आणि कुलवृत्तांताचे सहसंपादक **माधव नारायण** (पृ.३२९) यांच्या सौभाग्यवतींनी शिक्षण निधीला **रु.२०००** ची देणगी जाहीर केली.

**हितगुज :**

हितगुजची सभासद संख्या वाढून ती आता ८०० च्या घरांत पोचली आहे. विभागीय मेळावे आणि प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष सीताराम गोपाळ खांबेटे (पृ.६७६) यांचे गावोगावचे दौरे यांमुळे सभासद व हितगुजचे वर्गणीदार वाढण्यास चालना मिळते.

## असा बनला आपला 'लोगो'

**- राजा मराठे**
(राजाराम नारायण,पृ.२३५)
मालाड, मुंबई

मराठे प्रतिष्ठानशी माझा संबंध १२ वर्षांपूर्वी श्री. भाऊसाहेब मराठे यांच्या घरी आला. त्यांनी प्रतिष्ठानची सर्व माहिती दिली व हितगुजच्या 'लोगो'चं काम माझ्यावर सोपवले. 'हितगुज' या नावाच्या अक्षर रचनेविषयी मी विचार करू लागलो. आपण मराठे म्हणजे कुलबांधव, एका मोठ्या कुटुंबाचे घटक. कुटुंब म्हटलं की वाद-संवाद हा आलाच. ज्या घरात सुसंवाद चालतो ते घर नेहमी भरभराटीला येतं. दुसरी महत्वाची गोष्ट ज्या कुटुंबातील व्यक्ती आपले कोपरे दुसऱ्याला लागणार नाहीत अशा बेताने वागते तेथे सुसंवाद होतो. हे सूत्र माझ्या समोर मी ठेवलं अन् डिझाईन तयार केलं. 'हितगुज' या अक्षरात कुठेही कोपरा असता कामा नये. व प्रत्येक अक्षर दुसऱ्याशी संवाद करताना दाखवता आलं तर पहावं म्हणून मी काही डिझाईन्स केली व भाऊसाहेबांना दाखविली. त्यातून सध्या वापरात असलेले डिझाईन अस्तित्वात आले.

Marathe Pratishthan

उद्योग प्रेरणा समिती

## पेपर वाचून ज्ञान वाढवा, पेपर विकून दुवा मिळवा.

स्वयंरोजगाराला चालना देण्याच्या उद्देशाने मराठे प्रतिष्ठानच्या १६व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत 'उद्योग प्रेरणा समिती' स्थापन करण्यात आली. या समितीचा निमंत्रक म्हणून काम करण्याची जबाबदारी माझ्यावर सोपवण्यात आली आहे. ही समिती व्यवस्थापन सल्लागार म्हणून काम करील. मराठे कुटुंबीयांबरोबरच अन्य मराठी होतकरू उद्योग-व्यावसायिकांनाही सल्ला-मदत-मार्गदर्शनाचे काम ही समिती करील. त्यासाठी वाजवी शुल्क आकारण्यात येईल. **कुलबांधवांकडून नाममात्र शुल्क घेतले जाईल.**

उद्योग व्यवसायाच्या उपलब्ध संधी आणि उद्योग व्यवसाय उभा करण्यासाठी कराव्या लागणाऱ्या विविध गोष्टी यांबाबत केवळ शाब्दिक सल्ला देऊन भागणार नाही. **तज्ञ सल्लागाराचे अचूक मार्गदर्शन आणि बीजभांडवलाची उभारणी या दोन प्रमुख अडचणी प्रत्येक नवीन उद्योजकाला भेडसावतात. यासाठी मार्गदर्शनाबरोबरच प्रतिष्ठानचा प्रत्यक्ष सहभाग म्हणून एक 'उद्योग प्रवर्तन निधी' निर्माण करून त्यातून होतकरू उद्योजक-व्यावसायिक कुलबांधवांना कर्ज पुरवठा करायला हवा.** बिनव्याजी नव्हे; मात्र वाजवी अथवा माफक व्याजाने.

**'उद्योग प्रवर्तन निधी'साठी कुलबांधवांनी सढळ हाताने देणग्या तर द्याव्याच.** सगळेच कुलबांधव काही मोठ्या रकमेच्या देणग्या देऊ शकत नाहीत. पण प्रत्येकाला आपला 'खारीचा वाटा' म्हणून काहीतरी सहभाग या उपक्रमात आहे असे वाटावे या दृष्टीने मी **एक अभिनव योजना** सुचवीत आहे.

प्रत्येक कुटुंबात आजकाल एक तरी वृत्तपत्र विकत घेतले जाते. याची रद्दी विकून जी रक्कम येते ती आपण मासिक अंदाजपत्रकाचा विचार करताना क्वचितच लक्षांत घेतो. उत्पन्नाचा हा एक 'गुप्त' मार्गच असतो म्हणा ना! या रद्दी विक्रीने तसेच जुनेपाने कपडे विकून मिळणारी रक्कम जर आपण प्रतिष्ठानकडे 'उद्योग प्रवर्तन निधी'साठी पाठवलीत तर **तुमच्या खिशाला कात्री न लागतां या प्रकल्पात सहभागी झाल्याचे समाधान तुम्हाला लाभेल.** अशा लहान-लहान रकमांतून किती मोठा निधी निर्माण होऊ शकतो त्याची कल्पना आपल्याला नसते. एका कुटुंबाची तीन महिन्यांची रद्दी विक्री रक्कम रुपये ५० असेल असे मानले तर वर्षाचे होतात २०० रुपये. प्रतिष्ठानच्या सुमारे १२०० सभासदांपैकी निम्म्या सभासदांनी जरी या योजनेत सक्रीय सहभाग घेतला तरी **वर्षाला लाखाच्या वर रक्कम जमा होऊ शकते.**

अशाच प्रकारच्या आणखीहि कल्पक योजना अनेकांकडे असतील. त्यांनी कृपया अनमान न करता आपल्या अशा योजनांबाबत आम्हाला लिहावे. **मात्र प्रत्येक सभासदाने आपण रद्दी विक्रीची रक्कम प्रतिष्ठानकडे 'उद्योग प्रवर्तन निधी'ला पाठवणार असल्याचे त्वरित कळवावे.** तुमच्या अशा प्रतिसादाने आमचा उत्साह वाढतो.

ही रक्कम पाठवताना 'मराठे प्रतिष्ठान' या नावाने ***चेकनेच पाठवावी. चेकच्या मागे अथवा सोबतच्या पत्रात 'उद्योग प्रवर्तन निधी'साठी देणगी असा स्पष्ट उल्लेख करावा.***

मराठे परिवारांतल्या प्रस्थापित व भावी उद्योजक-व्यावसायिकांना कोणत्या प्रकारचे सहाय्य व मार्गदर्शन हवे आहे याबद्दलची माहिती संकलित करण्यासाठी एक प्रश्नावली याच अंकात पृष्ठ १५ वर दिलेली आहे. कृपया इच्छुकांनी ही प्रश्नावली भरून प्रतिष्ठानकडे पाठवावी. येथे छापलेला नमुनाच शक्यतो वापरावा. तो अंकातून फाडून, पाकिटांत घालून पाठवावा. **पाकिटावर 'उद्योग प्रेरणा समिती'ची प्रश्नावली असे आवर्जून लिहावे.**

या प्रश्नावलीमधून कोणत्या बाबतीत आपण काम करायला हवे त्याचे नेमके मार्गदर्शन आम्हाला होईल. त्यामुळे **जास्तीत जास्त वाचकांनी ही प्रश्नावली भरून पाठवावी असे आवाहन आहे.**

**- हेमंत महादेव** (पृ.४७१) निमंत्रक, उद्योग प्रेरणा समिती, विलेपार्ले, मुंबई (फोन:६१७७७५७)

---

शिक्षण समिती

## आजी-माजी विद्यार्थीवर्गाला आवाहन

मराठे प्रतिष्ठान दरवर्षी आपल्या परिवारातील विद्यार्थ्यांचे परिक्षेत चांगल्या रितीने यश संपादन केल्याबद्दल पारितोषिके देऊन कौतुक करत असते. आपल्या परिवारातील लोकांनी कौतुक केल्यामुळे विद्यार्थ्यांना अधिक प्रोत्साहन मिळतेच शिवाय त्यांच्या मनात परिवाराबद्दल जास्त जवळकीची भावना निर्माण होते.

प्रतिष्ठान गेली १२-१३ वर्षे दरवर्षी पारितोषिके देण्याचा उपक्रम करत आहे. **आत्तापर्यंत जवळ-जवळ दोनशे विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली आहेत.** काही विद्यार्थी उच्च शिक्षण संपवून चांगल्या नोकरीस (भारतात अथवा परदेशात) लागले असतील किंवा स्वतंत्र व्यवसाय करत असतील. प्रतिष्ठानची अशी विनंती आहे की अशा विद्यार्थ्यांनी त्यांच्या पुढील प्रगतीबाबत कळवावे. तसेच प्रतिष्ठानच्या वेगवेगळ्या उपक्रमासाठी कशा तऱ्हेने सहाय्य करू शकतात हे कळविले तर प्रतिष्ठानला आनंद वाटेल.

याचबरोबर सध्या जे विद्यार्थी पारितोषिके मिळवीत आहेत त्यांनीही प्रतिष्ठानच्या उपक्रमास ते कसा हातभार लावू शकतील हे कळवावे. प्रतिष्ठानचे कार्य पुढे नेण्यासाठी युवा पिढीने पुढे येणे जरूरीचे आहे. यासाठी परिवारातील आजी-माजी विद्यार्थ्यांनी सहकार्य करावे अशी प्रतिष्ठानची मनापासून इच्छा आहे.

यंदाच्या वर्षापासून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला जास्त प्रोत्साहन द्यावे या हेतूने प्रतिष्ठाने पारितोषिकांच्या रकमेत वाढ केली आहे. याकरिता गुणांचे जास्त टप्पे निर्माण केले आहेत ते खालीलप्रमाणे-

| **परीक्षा/गुणवत्ता (टक्केवारी)** | **पारितोषिकाची रक्कम (रु.)** |
|---|---|
| १) **१०वी** | |
| ७० ते ७५ पेक्षा कमी | १५० |



Marathe Pratishthan

| | | |
|---|---|---|
| ७५ ते ८० पेक्षा कमी | २०० |
| ८० ते ८५ पेक्षा कमी | २५० |
| ८५ ते ९० पेक्षा कमी | ३०० |
| ९० पेक्षा अधिक | ३५० |
| बोर्डात मेरिट मात्र ९० पेक्षा अधिक | ५०० |
| बोर्डात हिंदीत जास्तीत जास्त गुण | १०१ |
| बोर्डात तांत्रिक विषयांत (व्होकेशनल) सर्वाधिक गुणधारक कुलबांधवास 'गणेश' पारितोषिक | ५०१ |

२) **१२वी**

| | |
|---|---|
| ६० ते ७० पेक्षा कमी | *१५० |
| ७० ते ७५ पेक्षा कमी | *२५० |
| ७५ ते ८५ पेक्षा कमी | *३०० |
| ८५ ते ९० पेक्षा कमी | *३५० |
| ९० पेक्षा अधिक | *४०० |
| बोर्डात मेरिट मात्र सायन्स ९० पेक्षा अधिक, आर्टस्/ कॉमर्स ८५ पेक्षा अधिक | ५०० |

* आर्टस्/कॉमर्स साठी प्रत्येक टप्प्यात रुपये ५० अधिक.

(टक्केवारी एकूण गुणांवर [Grand Total] फक्त PCM / PCB नाही.)

३) **पदविका**
प्रथम वर्ग - २५०, खास वर्ग - ३००

४) **पदवी**
प्रथम वर्ग - ३००, खास वर्ग - ३५०

५) **पदव्युत्तर**
द्वितीय वर्ग - २५०,प्रथम/खास वर्ग - ३५०

६) **अत्युच्च पदवी** (पी.एच.डी,सी.ए.इ.,) ५००

७) **विशेष नैपुण्य** (क्रीडा, संगीत, नाट्य इ.)

| | |
|---|---|
| जिल्हा स्तरावर निवड | २५० |
| राज्य स्तरावर निवड | ३५० |
| देश स्तरावर निवड | ५०० |

८) **४थी/७वी स्कॉलरशिप मेरिट** १५०

जून महिन्यापासून विविध परीक्षांचे निकाल जाहीर व्हायला सुरवात होईल. वरीलप्रमाणे गुणवत्ता प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांनी गुणतक्त्याच्या प्रतीसह **दि. १५ ऑगस्ट १९९९** पूर्वी प्रतिष्ठानकडे आपापले अर्ज पाठवावे.

**- डॉ. सुरेंद्रनाथ गणेश** (पृ.२८४)
निमंत्रक, शिक्षण समिती, घाटकोपर, मुंबई
(फोन:५११३८५३)

**विज्ञान कुतुहल**

## अणुराख, किरणोत्सार (रेडिएशन) इ.

**- डॉ. सुरेंद्रनाथ गणेश** (पृ.२८४), घाटकोपर, मुंबई. (फोन : ५११ ३८५३)

अणुऊर्जेपासून वीजनिर्मिती बरेच देश करत आहेत. याकरता अणुभट्टीची निर्मिती झाली. यासंदर्भात 'अणुकचरा' किंवा 'अणुराख' असे शब्द वाचनात येतात व यातून काळजीचे सूर ध्वनित होतात. 'अणुराख म्हणजे काय' हे सर्वसामान्यांना कदाचित माहीत नसावे म्हणून यासंबंधी थोडक्यात माहिती.

अणुभट्टीत इंधन म्हणून बहुधा जड असा युरेनियम धातु अथवा त्याच्या ऑक्साइड सारख्या रासायनिक स्वरूपात असते. हे इंधन सळी अथवा गुटिकाच्या (अनेक गुटिका मिळून सळीच्या रूपात) आकारात बनवितात. अणुभट्टीत न्यूट्रॉन कणाची अणुकेंद्रकीय प्रक्रिया जड युरेनियम अणुबरोबर झाली की त्या अणुचे विघटन होते. परिणामतः यातून दोन (एक जोडी) मध्यम आकाराचे नवीन अणु तयार होतात. (मध्यम आकारात शे-दोनशे तरी वेगवेगळे अणू असतात. त्यापैकी एक जोडी) याबरोबरच प्रचंड ऊर्जा हीच अणुऊर्जा निर्माण होते. अशा कोट्यावधी अणूंचे विघटन अणुभट्टीत होत असते.

नवीन तयार झालेले वेगवेगळे अणु खूप अस्थिर असल्याने त्यांच्यापासून तीव्र किरणोत्सार सतत कित्येक वर्षांपर्यंत बाहेर येत असतो. मात्र हे अणु मूळ इंधनाची सळी किंवा गुटिकेतच बंदिस्त असतात. (क्रिप्टॉन, झेनॉन इ. वायू व्यतिरिक्त) इंधनाचा पुरेसा वापर झाल्यानंतर ते निकामी होते व अणुभट्टीतून बाहेर काढावे लागते. यास 'जळालेले इंधन' किंवा 'अणुराख' म्हणतात. लाकूड, कोळसा जाळल्यानंतर उरते ती राख. ती थंड झाल्यावर आपण त्याची चिंता करत नाही. (उलट काही कामाकरता वापरतो.) परंतु अणुभट्टीत जळलेल्या इंधनाची किंवा अणुराखेची मात्र काळजी किरणोत्सारामुळे घ्यावी लागते. (यातील न जळलेले इंधन व काही किरणोत्सारी अणु अत्यंत उपयुक्त असतात.) अशा अणुराखेची विल्हेवाट लावणे हे एक स्वतंत्र व्यवस्थापन शास्त्रच आहे.

**वैद्यकीय समिती**

## निमंत्रकांचे मनोगत

मराठे प्रतिष्ठानच्या वैद्यकीय समितीचे निमंत्रक म्हणून सर्वांनी माझ्यावर मोठ्या विश्वासाने फार मोठी जबाबदारी टाकली आहे. या विश्वासाला तडा जाणार नाही अशा जाणीवेने, विनम्रतेने ही जबाबदारी मी स्वीकारली आहे. आपले सक्रिय सहकार्य मी त्याच हक्काने मागत आहे.

९ जानेवारी १९९९ रोजी 'कर्करोग आणि आपण' आणि 'ॲनेस्थेशिया - समजुती आणि अपसमज' या विषयांवर व्याख्याने आयोजित केली होती. पण त्या वेळी उपस्थिती फारच कमी असल्याने पाहुण्यांसमोर मला मान खाली घालावी लागली. कुलबांधवांकडून माझी अशी अपेक्षा नव्हती.

कार्यक्रमासंबंधी सुधारणा, बदल आदि गोष्टी निःसंकोचपणे कळवाव्या. हे कार्यक्रम आपणा सर्वांसाठीच तर आयोजित करायचे आहेत. व्याख्याने, शिबिरे, कार्यशाळा, असे कार्यक्रम आयोजित करण्याची कल्पना आहे. त्याबाबतची सूचना हितगुजमधून देण्यात येईल. (वृत्तपत्रातल्या 'स्थानिक कार्यक्रम' सदरातही शक्यतो माहिती देण्याचा प्रयत्न करण्यात येईल.)

हितगुजमध्ये प्रत्येक अंकात एक आरोग्य विषयक लेख देण्यात येईल. या अंकात पावसाळा तोंडावर असल्यामुळे 'सर्दी-पडसे-खोकला' या बाबतचा लेख देत आहे.

मराठे परिवाराची रक्तगट सूचीही तयार करण्याचा विचार आहे. त्याबाबतची पूर्ण माहिती (आपले नाव, वय, पत्ता, फोन व रक्तगट) प्रतिष्ठानच्या कार्यालयांत त्वरित पाठवावी.

**- डॉ. शरद दत्तात्रय** (पृ.४१७)
शिवाजी पार्क, दादर, मुंबई (फोन:४४६ ७५३१)
निमंत्रक, वैद्यकीय समिती.



Marathe Pratishthan

# सर्दी-पडसे-खोकला..

**- डॉ. शरद दत्तात्रय** (पृ.४१७), शिवाजी पार्क, मुंबई. (फोन : ४४६ ७५३१)

आता पावसाळा आला. म्हणजे आता घरोघरी माणसे सर्दी-पडसे-खोकल्याने बेजार. तसे पाहिले तर अलिकडे सर्दी, पडसे, खोकलाही कांही केवळ पावसाळ्याची मक्तेदारी राहिली नाही. मोठमोठ्या शहरांतून आता वायूप्रदूषणामुळे वर्षभर ही त्रयी धुमाकूळ घालते आहे.

सर्दी-पडसे-खोकला ही अनेक रोगांची लक्षणे आहेत. असे म्हणतात की औषध घेतले तर सर्दी वगैरे आठवड्यांत बरी होते नाहीतर सात दिवस लागतात. आणि ते काही अर्थी खरेही आहे. बहुतांशी साधी सर्दी-पडसे-खोकला ही ॲलर्जी किंवा क्षुल्लक रोगजंतूमुळे (Mild Infection) होते आणि आपल्या रोगनिवारक प्रतिकारशक्तिमुळे बरीही होते.

असे असले तरीही आपण मुख्यतः लहान मुलांच्या (नवजात ते वय वर्षे ५ पर्यंत) अशा सर्दीकडे बारकाईने लक्ष ठेवणे आवश्यक आहे. कारण, पोलिओची लक्षणे मुख्यतः हीच आहेत. अशा वेळी मुलांना विश्रांती देणे आवश्यक आहे. त्यांच्या नेहमीच्या हालचालीत कुठे शैथिल्य नाही ना ह्याकडे बारकाईने लक्ष देणे जरूरीचे आहे आणि आवश्यकतेनुसार योग्य वैद्यकीय सल्ला घेणे हि निकडीचे आहे. यासाठीच सर्व प्रतिबंधक लसी योग्य वेळी घेणे नितांत जरूरीचे आहे. त्यामुळे पोलियो, घटसर्प (Diphtheria), गोवर (Measles) , डांग्या खोकला, आदि रोगांपासून जवळ-जवळ पूर्ण बचाव होतो.

क्षय व ट्रॉपिकल इओझिनिफिलिया ह्या रोगांमध्ये खोकला हे मुख्य लक्षण आहे. क्षयरोगात खोकल्याबरोबर कफ पण पडतो तर इओझिनिफिलियांत कोरडा खोकला (Barking Cough) असतो. तसेच, आपल्याकडील हवामानात अमिबियासिस हा रोग वरचेवर होतो. या रोगामध्येही खोकला व शौच्याच्या नेहमीच्या पद्धतीत (Rhythm) बदल जाणवतो.

दमा व अस्थमा हे रोग ॲलर्जीमुळे होतात असे मानले जाते. हे रोग संपूर्णतः बरे होणे दुरापास्त - अशक्य नसले तरी अवघड. पण वेळोवेळी योग्य उपाय करून त्यांची तीव्रता बरीच कमी करता येते. यावर ह्युमन इन्म्युनोग्लोबिन्स (Human Inmunoglobins) ची इंजेक्शन्स आहेत. पण सध्या एडस्च्या भीतीने त्यांची निर्मिती थंडावली आहे.

फुफ्फुसाच्या कर्करोगामधेही खोकला हे प्रधान लक्षण आहे. पंधरवड्यानंतरही औषधोपचाराने बरा न होणारा खोकला, खोकल्याची बदललेली तऱ्हा (Changed Pattern) ही विशेष लक्षांत घ्यायला हवीत.

तसेच अनेकदा औषधाच्या विपरीत परिणामामुळेही (Drug Reaction) खोकला होऊ शकतो. बहुधा, सर्दी-पडसे-खोकला हे नैमित्तिकच असते. चार-आठ दिवसांत त्यापासून मुक्तता मिळते हे खरे जरी असले तरी वरील गोष्टी आपण लक्षात ठेवाव्यात म्हणजे योग्य वेळी तत्परतेने वैद्यकीय सल्ल्यानुसार या रोगांना अटकाव करता येईल व आपली प्रकृती सुदृढ ठेवण्यास मदत होईल. ❀❀

---

# मराठे प्रतिष्ठानचे सांगलीतील वधू-वर माहिती केंद्र

**- सौ. गायत्री गोविंद लेले,** मिरज (विठ्ठल महादेव, पृ.२३५ यांची मुलगी)

मराठे प्रतिष्ठान ही १९८० मध्ये पब्लिक ट्रस्ट ॲक्टखाली नोंदविलेली संस्था मराठे परिवाराच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत आहे. संस्थेचे मुख्य कार्यालय मुंबई येथे आहे.

प्रतिष्ठानचे कार्य म्हणून ब्राह्मण समाजासाठी पुणे, औरंगाबाद, मुंबई येथे वधू-वर सूचक मंडळे चालविली जात होती. सांगलीचे श्री. वि. म. मराठे यांनी शासकीय सेवेतून निवृत्त झाल्यानंतर प्रतिष्ठानसाठी सांगली येथे वधू-वर सूचक मंडळ चालविण्याचे ठरविले. त्याप्रमाणे प्रतिष्ठानच्या परवानगीने गेली दोन वर्षे ते विश्रामबाग सांगली येथे वधू-वर माहिती केंद्र चालवीत आहेत.

या मंडळातर्फे कोणत्याही स्थळाची शिफारस केली जात नाही अगर विवाह जमविण्यात मध्यस्थी केली जात नाही. त्यामुळे श्री. मराठे यांनी आपल्या केंद्राचे नाव वधू-वर माहिती केंद्र असे ठेवले आहे. दर रविवारी संध्याकाळी ५ ते ७ या वेळेत विश्रामबाग येथे 'पद्मश्री' या आपल्या निवासस्थानात ते स्वतः हे केंद्र चालवितात. १५ रुपये इतके नाममात्र शुल्क एकदाच घेऊन वधू-वरांची नावे नोंदविली जातात. नोंदवलेल्या स्थळांची यादी गरजूंना उपलब्ध करून दिली जाते. त्यांच्याकडे आता ३५० ते ४०० स्थळे आहेत. देशस्थ, कोकणस्थ अशी वेगवेगळी रजिस्टर्स ठेवली आहेत. रजिस्टरमध्ये माहिती अशा रीतीने भरली जाते, की एका ओळीतच स्थळाचे नाव, वय, उंची, शिक्षण, प्राप्ती इत्यादी माहिती नजरेखालून घालता येते.

त्यांच्याकडील स्थळांची माहिती ते पुण्यातील मराठे प्रतिष्ठानच्या केंद्रास पाठवितात व तेथील स्थळांची यादी प्राप्त करतात.

त्यांच्याकडे अर्ज भरून नोंदविलेली स्थळे त्यांच्या माहितीतील असतात अगर माहितीतील व्यक्तीमार्फत आलेली असतात. त्यामुळे माहितीमध्ये फसवणुकीचा धोका नसतो. लवकरच एम.सी.एस. या त्यांच्या संगणक केंद्राच्या मदतीने सर्व माहिती फोटोसह तात्काळ उपलब्ध करून देण्याचा त्यांचा विचार आहे.

फसवले गेल्यामुळे नाममात्र घटस्फोटित अगर दुर्दैवाने विधुर/विधवा झालेल्या स्थळांबाबत विशेष प्रयत्न करण्याचे त्यांनी ठरविले आहे. त्यांच्या उपक्रमास वर्ष प्रतिपदेस दोन वर्षे पूर्ण झाली. त्यांच्या कार्यास शुभेच्छा! ❀❀



Marathe Pratishthan

## सभासद वृत्त

**मानसन्मान :**

**कार्यतत्पर आमदार माधव मराठे**

**आमदार माधव कृष्ण** (पृ.४८७) **यांच्या दुसऱ्या कार्यवृत्ताचे प्रकाशन** नुकतेच मुंबईत झाले. त्यावेळी समारंभाचे अध्यक्ष केंद्रीय गृह, रेल्वे, संसदीय कार्य व नियोजन राज्यमंत्री राम नाईक म्हणाले की त्यांनी आमदार निधीतून कामे करताना मतदार संघातील झोपडपट्टीत राहणाऱ्या गोर-गरीबांच्या, विशेषतः महिलांच्या गरजांकडे अधिक लक्ष दिले आहे.

याच प्रसंगी बोलताना महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री गोपीनाथ मुंडे म्हणाले की, अनेक ज्येष्ठ आमदार मंत्री झाल्यामुळे सभागृहात शासनाची धोरणे मांडण्याची जबाबदारी आम्ही ज्या आमदारांवर टाकतो त्यात माधव मराठे हे प्रमुख आहेत व दिलेली कामगिरी ते समर्थपणे पार पाडतात याचा मला अभिमान आहे.

आपल्या मतदार संघातल्या प्रश्नांबाबत तर ते अतिशय दक्ष असतातच. पण त्याबरोबरच महाराष्ट्रातल्या निरनिराळ्या प्रश्नांवरही ते अभ्यासूपणे आपली मते विधानसभेत मांडतात.

आमदारकीच्या काळात केलेल्या कामाचा अहवाल आपल्या मतदारांना वार्षिक देणारे जे मोजकेच आमदार आहेत त्यात माधवरावांचा समावेश होतो. **मराठे परिवारातर्फे माधवरावांना शुभेच्छा!**

**राष्ट्रभाषा पंडित लक्ष्मण पांडुरंग**

वेंगुर्ले येथील हिंदी प्रचार सभेचे कार्यवाह, पाटकर हायस्कूलचे अध्यापक राष्ट्रभाषा पंडित **लक्ष्मण पांडुरंग (पृ.५३४), यांना राष्ट्रभाषा हिंदी प्रचार व प्रसार कार्याबद्दल महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे यांचेतर्फे विशेष पुरस्कार** देण्यात आला. २० फेब्रुवारी १९९९ रोजी पुण्यात झालेल्या कार्यक्रमांत उपराष्ट्रपती कृष्णकांत यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र देऊन 'ल.पां.' चा गौरव करण्यात आला.

तसेच १८ मार्च १९९९ रोजी हिंदी प्रचार सभा, वेंगुर्लेच्या ४३व्या वर्धापनदिन समारंभांतहि दीर्घकाळ काम करणारे कार्यवाह म्हणून 'लपां' व सौ. अस्मिता मराठे यांचा शाल व श्रीफळ देऊन खास सत्कार करण्यात आला.

**नांदा सौख्यभरे :**

१) प्रतिष्ठानचे कर्जत (जि. ठाणे) येथील सभासद **रवींद्र गोविंद (पृ.२२०) यांचा मुलगा मनीष याचा विवाह** कर्जत येथील इंजिनिअरिंग कॉलेजमधील लेक्चरर आरती मोहनराव कुळकर्णी हिच्याशी डोंबिवली येथे २४-१-१९९९ रोजी संपन्न झाला.

२) कोफराड गांव, पो. आगाशी, ता. वसई, जि. ठाणे येथील सभासद **माधव रामकृष्ण (पृ.१९) यांचा मुलगा उमेश याचा विवाह** गोपाळ गणेश गुर्जर यांची मुलगी ललिता हिच्याशी वसई येथे ३०-४-१९९९ रोजी संपन्न झाला.

**नवविवाहित वधू-वरांस मराठे प्रतिष्ठानतर्फे शुभेच्छा.**

**सहवेदना :**

अंधेरी, मुंबई येथील सभासद **वामन नारायण (पृ.७३०) यांचे वडील नारायण उर्फ कृष्णाजी वासुदेव चक्रदेव,** कुर्धे यांचे शुक्रवार दि. ३०-४-१९९९ रोजी आकस्मिक निधन झाले. ते ८८ वर्षांचे होते. वयाच्या ५व्या वर्षी वडिलांचे निधन झाल्यावर आई व पत्नी यांचे मदतीने अपार कष्ट करून नारळी व आंब्याच्या बागा तयार केल्या. उत्तम धनसंचय करून समाजऋण फेडण्याच्या दृष्टीने पंचक्रोशीतील मंदिरे, शाळा, पाठशाळा, रस्ते, नाट्यगृह यांसाठी उदार हस्ते देणग्या दिल्या. पूर्वी ठिकाण चक्रदेव येथील पोलीस पाटिलकी यांचेकडे होती. ग्रामस्थांचे छोटे-मोठे तंटे सोडवण्यात त्यांचा पुढाकार असे. सर्वांना बरोबर नेणारे असे व्यक्तिमत्व हरपल्याने सर्व ग्रामस्थांनी त्यांच्या निधनाबद्दल अतिशय हळहळ व्यक्त केली. ईश्वर मृतात्म्यास सद्गति देवो!

**त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सर्व मराठे परिवार सहभागी आहे.**

---

## वसंत गौरव - ८ मे १९९९

- **विनायक केशव** (पृ.२०), वरळी, मुंबई. कार्यवाह मराठे प्रतिष्ठान

या वर्षीचा वसंतोत्सव वैशाखाच्या उत्तरार्धात झाला. चैत्र पालवी बालपणाचा उंबरठा ओलांडून गर्द हिरवा शालू नेसून दिमाखात मिरवत होती. वैशाख वणवा शब्दाची चुणूक देणारा उन्हाळा बेचैन करीत होता. लोक मृगाच्या आगमनाची स्वप्नं रंगवीत होते. अशा उरभरल्या वातावरणांत आपण वसंताला आवतण दिलं.

कार्यक्रमाला सुरवात नटेश्वर शिवाच्या मानस पूजेने झाली. **कु. अनुजा सदानंद** (पृ.४२७) मंचावर आली आणि खणखणीतपणे नादमधुर शब्दांत तिनं शिव मानसपूजेच्या पंक्ती म्हणण्यास सुरवात केली. या मानसपूजेने कार्यक्रमाला एका वेगळ्याच पातळीवर नेलं.

नटेश्वराची मानसपूजा आटोपल्यावर **कु. केतकी सुधीर चक्रदेव** (पृ.७३१) या शाळकरी मुलीने एक-दोन गीतं आणि नंतर भरतनाट्यम् ची झलक दाखविली. भक्तप्रेमी शिवाला लहान बालकांनी केलेली सेवा अतिशय आवडते असं म्हणतात. केतकीचं कौतुक प्रेक्षकांनी टाळ्यांच्या गजरात केलं. तिने म्हटलेल्या 'मन मे राम तन मे राम' हे भजन ऐकताना अनुप जलोटांची आठवण झाली. त्यानंतर **वामन गोविंद** (पृ.७०५) यांचा नातू **सचिन शरद खांबेटेंनी** बुलबुलतरंग या वाद्यावर काही गाणी पेश केली.

प्रतिष्ठानचे एक **विश्वस्त श्री. अरविंद दामोदर** (पृ.२९२) **यांची नात कु. सदया मयेकर** हिने कविवर्य मंगेश पाडगांवकर यांच्या दोन कविता साभिनय म्हणून दाखविल्या. अगदी दस्तुर खुद्द पाडगांवकर स्टाईलने! कविता ज़ाणून घेतल्याशिवाय कविता म्हणताना कवितेतील भावना चेहऱ्यावर व्यक्त करता येत नाहीत. निवेदक भाऊ मराठेंना कौतुक आवरता येईना. एक कविता गाऊन झाल्याबरोबर दुसरी कविता सुरू करण्याअगोदरच भाऊंनी सदयाचं कौतुक केलंच पण सदयाच्या कविता जाणून घेण्याच्या क्षमतेबद्दल आश्चर्यसुद्धा व्यक्त केलं. प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट करून



Marathe Pratishthan

भाऊंच्या विचारांना पाठिंबा दर्शवला.

कुलभगिनी **श्रीमती शुभदा पांडुरंग जोशी यांची कन्या सौ. अनुराधा कट्टी** (पृ.७४७) यांनी 'सांज ये गोकुळी' आणि 'एक सूर चराचर छायों' या दोन रचना पेश केल्या. सौ. कट्टींनी शास्त्रोक्त संगीताचं रीतसर शिक्षण घेतलं आहे. आणि त्यांनी मेहनतही खूप घेतली आहे. याचं प्रतिबिंब त्यांच्या गायनात दिसून आलं. कुलबांधवांतर्फे सौ. अनुराधाना शुभेच्छा.

त्यानंतर **कु. संगीता दिलीप** (पृ.४६९) अत्यंत सुरेल आवाजात 'तरुण आहे रात्र अजूनी' आणि पं. हृदयनाथ मंगेशकरांनी संगीतबद्ध केलेले पहिले गीत 'चांदणे शिंपीत जाशी' ही दोन लोकप्रिय गाणी सादर केली. प्रेक्षकांनी संगीताचं खूप कौतुक केलं. दुसऱ्या गाण्याला ती वन्स मोअर मिळवून गेली. 'संगीता' हे सार्थ नाव ठेवल्याबद्दल तिच्या आई-वडिलांचे खरोखर कौतुक करायला हवे.

त्यानंतर **वामन गोविंद** (पृ.७०५) यांची नात **चंद्रभागा शरद खांबेटेंनी** 'हाए रे वो दिन क्यूँ ना आए' ही रचना सादर केली.

त्या पाठोपाठ **मृणाल जोशींनी** 'हृदयी प्रीत जागते' आणि 'दिसते मजला सुख चित्र नवे' ही 'गदिमां'ची भावगीते सादर केली.

त्यानंतर **अनंत धोंडो** (पृ.६९८) **यांच्या बहिणीची मुलगी तनया अंकलीकर** हिने गाजलेले दोन अभंग तन्मयतेने सादर केले.

प्रतिष्ठानच्या कार्यक्रमात नेहमी आपलेपणाने भाग घेणारी **संध्या सदानंद खांबेटे** (पृ.६९६) मंचावर आली व 'हे चांदणे फुलांनी शिंपीत रात्र आली' हे गाणे आपल्या गोड गळयाने सादर केलं. पाठोपाठ 'एकाच या जन्मी जणू फिरून मी जन्मेन मी' हे भावपूर्ण व आशयघन गीत तिनं तितक्याच ताकदीनं सादर केलं.

मैफल ऐन रंगात आली होती. रसिकांची भूक वाढली होती. आपले **गोमांतकातले कुलबंधू बाळकृष्णबुवा मराठे** (बाळकृष्ण रामनाथ - पृ.५४८ खरं म्हणजे ते एवढे तरुण आहेत की बाळकृष्ण बुवा म्हणून मी आभार मानताना त्यांचा उल्लेख केला तेव्हा ते चक्क लाजले) यांनी मैफलीचा ताबा घेतला आणि कै. वसंतराव देशपांडे यांनी अमर केलेलं नाट्यगीत 'घेई छंद मकरंद' अगदी वसंतरावांची आठवण यावी एवढ्या तयारीने सादर केलं. पाठोपाठ 'अनंता तुला कोण पाहू शके रें' हे करुणरसातील भक्तीगीत सादर केले. पण या पेशकारींनी समाधान न झाल्यामुळे बुवांनी मेहंदी हसन यांची जगप्रसिद्ध गझल 'चुपके चुपके' सादर केली. भावना ओथंबून आल्यावर शब्द आणि हुंदका यांच्या आडवाआडवीमुळे काहीसे अस्पष्ट पण पावसाळी भरल्या ढगाप्रमाणे गंभीर वाटणाऱ्या नाजूक शब्दपंक्तींनी वातावरण भरून जातं. काही म्हणा गझल हा गानप्रकार कदाचित परकी असेलही पण दर्दभऱ्या मुखातून एक एक शब्द अभिषेकपात्रातून पडणाऱ्या पाण्याच्या थेंबाप्रमाणे जेव्हा मैफलीत पाझरतो तेव्हा काय होतं हे शब्दात पकडताच येत नाही. ते अनुभवावंच लागतं.

पूर्वार्धाच्या शेवटी **कार्यक्रमाचे संयोजक पं. गणेशबुवा जाईल** (गणेश मोरेश्वर - पृ.७५७) यांनी सद्गुरु स्वरूपानंद स्वामी यांची एक अत्यंत रसाळ, समर्पणाची भावना चित्रित केलेली भक्तीरचना सादर केली. रचना साक्षात् सद्गुरु स्वरूपानंदांची, सादरकर्ते स्वामींचे एकनिष्ठ भक्त गणेशबुवा आणि **साथीला सौ. विद्या जाईल आणि चि. श्रीपाद जाईल** हा चौपदरी प्रसाद बुवांनी खास कुलबांधवांकरिता तयार केला होता. ऋतुराज वसंताची महापूजा होती ना? मग प्रसाद त्याला साजेसा नको कां? म्हणतात प्रसाद हा प्रसाद असतो. त्याचं वर्णन करणं अशक्यच. बुवांच्या गायनालाही हाच नियम लागू पडतो.

उत्तरार्धात **सौ. सुलभा सुरेंद्रनाथ** (पृ.२८४) यांनी व. पु. काळे यांची 'पपा' ही कथा अतिशय सुंदर शब्दात सादर केली. नाजूक पण काहीशी गुंतागुंतीच्या कौटुंबिक संबंधांची वीण या कथेत फारच सुरेख शब्दांकित केली आहे. सौ. सुलभाताई आता प्रथितयश कथाकथनकार झाल्या आहेत हे जाणवत होते.

मध्यंतरात वसंत पेय आणि आंब्याची डाळ यांचा आस्वाद घेत कुलबांधव अनौपचारिक गप्पागोष्टीत रंगले होते. त्यानंतर **श्री. भाऊ मराठे** (सदानंद विष्णू - पृ.५०७) **यांनी तयार केलेला एक खास कार्यक्रम** सादर झाला. हा कार्यक्रम म्हणजे **कविश्रेष्ठ कै. कुसुमाग्रज यांना काव्यआदरांजली**. कविश्रेष्ठांचे गुणवर्णन गद्यातल्या शब्दांनी थोडेच करता येणार? शब्दप्रभूंना त्यांच्याच काव्यपंक्तीतून वंदना करणं हे यथोचित आहेच. पण त्यांच्या शब्दपंक्तीमधून त्यांचं भावचित्र रसिकांपुढे उभं करणं हे ताकदीचं काम आहे यात शंकाच नाही.

**सौ. मंजिरी मराठे** (मंजिरी श्रीनिवास- पृ.३९२) आणि **सौ. मालविका मराठे** (मालविका रणजित, पृ.३२७) यांनी कुसुमाग्रजांना त्यांच्या रचना पेश करून साकार केलं एवढाच अभिप्राय मला देता येईल. अर्थात् भाऊ काव्यवाचनाला, निवेदनाला, संयोजनाला होतेच. मला तर हा उपक्रम अतिशय भावला. **भाऊंनी मराठी सारस्वताला श्रीमंत करणाऱ्या लेखकांना, कवींना कलावंतांना अशा उपक्रमांच्या मदतीने साकार करावेत. विशेषतः तरुण पिढीला ते समजावून द्यावेत.** मग भले कार्यक्रमाला गर्दी होवो वा न होवो. तमाम मराठे कुलबांधवांतर्फे भाऊंच्या पाठीवर कौतुकाची थाप आणि अशाच कार्यक्रमांची आग्रहपूर्वक मागणी.

कार्यक्रम संपला. संपन्न झाला म्हणत नाही कारण माझ्या गुरुजींनी संपन्न या शब्दाचा सांगितलेला

**मधुमेहावर व्याख्याने**

मराठे प्रतिष्ठान, वैद्यकीय समितीतर्फे शनिवार **दि.२४-७-१९९९ रोजी सायं. ५ वाजता 'मधुमेह'** या विषयावर **डॉ. अरविंद सदाशिव गोडबोले** आणि **'मधुमेहींचा आहार'** या विषयावर **डॉ. सौ. अनुराधा अरविंद गोडबोले** यांची व्याख्याने आयोजित करण्यात आली आहेत.

ही व्याख्याने, कुलबांधवांना येणे सोयीचे व्हावे म्हणुन **न्यू लॉ कॉलेज (दुसरा मजला), रुपारेल कॉलेज कंपाऊंड,** माटुंगा, मुंबई- ४०० ०१६ येथे आयोजित केली आहेत.

कुलबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या संधीचा फायदा घ्यावा असे सर्वांना आवाहन करण्यात येत आहे.

Marathe Pratishthan

अर्थ निराळा आहे. असे कार्यक्रम संपू नयेत असं वाटतं. अशा वाटण्यातच या कार्यक्रमाचं यश सामावलेलं असतं.

विनंतीपत्रकातल्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून **कार्यक्रम चालू असतानाच खालील देणग्या प्राप्त झाल्या.**

१) श्री. सदानंद विष्णू मराठे (वांद्रे) रु. ५००/- २) सुप्रिया सु. मराठे (घाटकोपर) रु.५००/- ३) अशोक म. मराठे (शिवाजीपार्क) रु.२५०/- ४) सी. गो. खांबेटे (अंधेरी) रु. १०००/- देणगीदारांचे मनःपूर्वक आभार.

निरोप घेण्यापूर्वी मला आलेल्या दोन सूचना आपल्या नजरेला आणतो. पहिली सूचना - कार्यक्रम फक्त हिंदी व मराठी गझलांचा ठेवावा ही. कलावंत 'मराठे' असावेत असं बंधन नको. दुसरी सूचना - अनुभव कथनाचा एक कार्यक्रम असावा. आठवणी, अनुभव कोणीही सांगावे. त्याला कथनाचा पूर्वानुभव पाहिजे असे नाही. विशेषतः माप ओलांडून सासरी प्रवेश केल्यानंतर आलेल्या माहेरच्या (अगदी माहेरच्या अंगणासकट) आठवणींचे उमाळे. सासरी शब्दांच्या तीरांनी घायाळ झाल्यावर आलेल्या माहेरच्या आठवणी वगैरे वगैरे पहा. विचार करा आणि आम्हाला कळवा. मला वाटतं असा कार्यक्रम आपल्याला रिझवेल आणि रडवेल सुद्धा. एका रसिकाने अशा कार्यक्रमाचं नामकरणसुद्धा सुचवले आहे. 'माहेरच्या अंगणांत' छे! बुवा. यावर काय भाष्य करणार? पण एक विचार मनांत आला. भगिनींच्या या उत्सहाला आपला हितगुज आणि आपले कार्यक्रम तर कारणीभूत नाहीत ना?

❀❀

## येरे येरे पावसा

**- प्रीता करमरकर**, वय ८

(लक्ष्मण शंकर, पृ.५०३ यांची नात-श्रुतीची मुलगी)

येरे येरे पावसा, तुला देईन पैसा
पावसा पावसा येतोस का
एक महिना राहतोस का?
येर येरे पावसा, तुला देईन डोसा
पावसा पावसा येतोस का
दोन महिने राहतोस का?
येरे येरे पावसा, तुला देईन सामोसा
पावसा पावसा येतोस का
तीन महिने राहतोस का?
येरे येरे पावसा, तुला देईन अनरसा
पावसा पावसा येतोस का
चार महिने राहतोस का?
नंतर मात्र राहिलास तर मार देईन थोडासा!

# 'मधुमती'वरील कारवाई

- कै. गजानन अभ्यंकर, कमांडर (निवृत्त)

***'युद्धस्य कथा रम्या' असे म्हणतात. त्या वाचताना रम्य तर सर्वांनाच वाटतात. युद्धात पराक्रम गाजवणारा वीर पुरुष आपल्यातला असला तर आपला ऊर अभिमानाने भरून येतो.***

***भारतीय नौसेनेतली सर्व गौरवपदके प्राप्त करणारे गजानन अभ्यंकर हे पुण्यांतल्या विजय अनंत (पृ.१५५) यांचे जावई. त्यांची शौर्यगाथा गाताना सर्व मराठे कुलबांधवांना खचितच अभिमान वाटेल.***

***२८ जून १९९८ रोजी त्यांचे अचानक निधन झाले. त्यांच्या प्रथम पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या एका मर्दुमकीची ही कथा आणि त्यांच्या पत्नीने त्यांना वाहिलेली श्रद्धांजली. - संपादक***

चार डिसेंबर १९७१ हा आपल्या देशाच्या दृष्टीने आणि आम्हा नौसैनिकांच्या दृष्टीने अभिमानाचा दिवस. कारण याच दिवशी आमच्या लढाऊ जहाजांनी पाकिस्तानच्या कराची बंदरावर हल्ला चढवून त्यांच्या अनेक जहाजांना समुद्राच्या तळाला पोचविले आणि पाकिस्तानी नौदल पांगळे करून टाकले. आमची जहाजे म्हणजे 'त्रिशूल' व 'तलवार', आणि रशियाकडून नुकत्याच घेतलेल्या चार क्षेपणास्त्र नौका. या लढाईचे डावपेच आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या 'गनिमी काव्या'च्या तंत्रात काहीच फरक नव्हता. 'हिट अँड रन' हा छत्रपतींचा मंत्र आमच्या नौदलप्रमुखांनी अंमलात आणला.

कॅप्टन गांधी (कमांडिंग ऑफिसर, आयएनएस म्हैसूर) यांनी आणखी एक जबरदस्त डाव आखला. त्यांनी निवड केलेल्या जहाजांमध्ये माझे जहाज 'आयएनएस बेतवा' होते. या मोहिमेमुळे आम्ही सर्व अतिशय उत्साहात होतो. शक्यतो दिवसा समुद्रकिनाऱ्यापासून फारच दूर आणि रात्र झाली की संपूर्ण जहाज अंधारून टाकायचे. सर्व ध्वनिलहरी यंत्रणा एकदम बंद. फक्त आमचे श्वासच एकमेकांना ऐकू येतील एवढी शांतता सगळीकडे असायची.

'उद्या सकाळी आपण कराची बंदरावर हल्ला करणार' असा कॅप्टन गांधी यांचा संदेश आमच्या जहाजावर आला आणि ही रात्र केव्हा संपते, असे आम्हाला वाटू लागले. पहाटेचे चार वाजले होते आणि आमच्या ब्रीजवरील (जेथून जहाजाचे संचालन केले जाते) 'लुकआऊट'ने (दुर्बिणीतून टेहळणी करणाऱ्या नौसैनिकाने) जोरात ओरडून इशारा केला, की अंदाजे एक मैल अंतरावर एक जहाज दिसत आहे. हे जहाज आता कोठून आले, म्हणून आमची चलबिचल सुरू झाली. कारण त्या भागात जहाज दिसेल अशी अपेक्षा नव्हती. त्या जहाजाला आमच्या दोन्ही जहाजांनी घेरले आणि त्यावर सर्चलाईट टाकला. जहाजाच्या बाहेरील बाजूला नाव होते 'मधुमती'.

आमच्या मुंबईच्या ऑपरेशन ऑफिसला याबाबत संदेश पाठविला, तेव्हा 'ते' पाकिस्तानी जहाज असून, बहुतेक दारुगोळा व अन्नाची रसद घेऊन पूर्व पाकिस्तानला (जे पुढे बांगलादेश झाले) जात आहे. ते जहाज ताब्यात घेऊन मुंबईला या' असा आम्हाला आदेश मिळाला. आमच्या जहाजातून 'बोर्डिंग पार्टी' तयार करण्यात आली. तिचा प्रमुख



Marathe Pratishthan

मी होतो. तसेच 'आयएनएस म्हैसूर'मधून दुसरी 'बोर्डींग पार्टी' तयार करण्यात आली. एका नौकेतून आमची बोर्डींग पार्टी, तर दुसरीतून म्हैसूर बोर्डींग पार्टी, अशा दोन्ही नौका मधुमतीकडे वाटचाल करू लागल्या. मधुमतीने काही घातपात करू नये म्हणून आमच्या जहाजाच्या तोफा मधुमतीवर रोखल्या होत्या.

अकरा वर्षांपूर्वी गोवा मुक्तीच्या वेळी 'ऑपरेशन विजय'मधील अनुभवाची मला आठवण झाली. त्यावेळी आयएनएस म्हैसूर आणि आयएनएस त्रिशूल या आमच्या जहाजांवरून तोफांचा भडिमार सुरू झाला आणि थोड्याच वेळांत अंजदीव बेटावरून पांढरे निशाण फडकविण्यात आले. बेटाचा ताबा घेण्यासाठी आमची जहाजे किनाऱ्याकडे जाऊ लागली. किनाऱ्यापासून थोडे अंतर असताना जंगलात लपून बसलेल्या पोर्तुगीज सैनिकांकडून अचानक आमच्यावर गोळीबार झाला आणि आमचे अनेक नौसैनिक शहीद झाले. अशीच वेळ पुन्हा येणार नाही ना असा विचार क्षणभर मनात येऊन गेला.

आमची नौका मधुमतीजवळ गेली आणि दोराच्या मदतीने आम्ही मधुमती जहाजावर पोचलो. मी आणि माझ्या दोन सहकाऱ्यांनी ब्रीजवर धाव घेतली. कारण जहाजावरील सर्वात महत्वाची जागा म्हणजे ब्रीज. बाकी सहकाऱ्यांची तुकडी इजिन रूम, स्टोअर्स आणि सर्व जहाजाची तपासणी करण्यासाठी पाठवण्यात आली. दहा मिनिटांतच रिपोर्ट आला, की अन्नधान्याच्या स्टोअरमध्ये ४० ते ५० सशस्त्र सैनिक आहेत. तो रिपोर्ट आम्ही ताबडतोब म्हैसूर जहाजावर पाठविला.

लगेच म्हैसूरने मधुमतीला इशारा दिला की, ताबडतोब शरणागती पत्करा, नाही तर जलसमाधी! त्या इशाऱ्याचा परिणाम लगेचच दिसला. जहाजाने पांढरे निशाण दाखविले आणि शत्रूचे सर्व सैनिक शस्त्रे टाकून शरण आले. शरणागतीचे पांढरे निशाण दिसताच 'विजयी विश्व तिरंगा प्यारा, झंडा ऊँचा रहे हमारा' या विजयगीतात आम्ही रंगून गेलो.

आता इतक्या वर्षांनंतरही या प्रसंगाची आठवण झाली तरी विजयासाठी कराव्या लागणाऱ्या धाडसामुळे अंगावर रोमांच उभे राहतात.

(सकाळ, पुणे. दि. १९ मे १९९७ मधून साभार)

### श्रद्धांजली

कै. लेफ्टनंट कमांडर गजानन भिकाजी अभ्यंकर हे माझे पती. त्यांचा जन्म २० ऑगस्ट १९४२ रोजी शहीद राजगुरू ह्यांच्या गावी म्हणजे राजगुरुनगर, खेड, जि. पुणे येथे झाला.

अत्यंत हुषार, धाडसी, स्वाभिमानी (देशाचा व स्वतःचा) आणि त्याग व कर्तव्यदक्षता या पाच गुणांनी परीपूर्ण असं त्यांचं व्यक्तिमत्व होतं. 'मातृदेवो भव' आणि 'राष्ट्रदेवो भव' या दोन गोष्टी मनाशी ठरवून त्यासाठी काहीही करण्यास नेहमी तयार.

भारतीय नौदलात वयाच्या १५व्या वर्षी भरती झाले. नौदलाचे सर्वात मोठे जे गौरवपदक ज्याला 'नौसेनामेडल' असे म्हणतात ते वयाच्या अवघ्या १८व्या वर्षी संपादन केले. एक-एक करून वीर पुरुषाला शोभतील अशी सर्व गौरव पदके प्राप्त केली. अपयश या शब्दाला जीवनात थारा दिला नाही.

अशा या वीर पुरुषाची पत्नी होण्याचं भाग्य माझ्या नशिबी होतं ह्याचा मला सार्थ अभिमान आहे.

*राष्ट्रसेवेत केलीत तुम्ही, प्राणपणाने कर्तव्यपूर्ती ।*
*नच विसरता येती कुणाला, या तुमच्या सुवर्णस्मृती ॥*
*जीवनाच्या पर्वात केलीत, सर्वांवर प्रेमाची बरसात ।*
*धडपडीची जीवन ज्योत झाली, आज विलीन अनंतात ॥*

**- स्वाती गजानन अभ्यंकर**
(विजय अनंत, पृ.१५५ यांची मुलगी), पुणे.

# पानवाला

**- वामन गणेश** (पृ.५०३), नेरूळ, नवी मुंबई

एक सौ बीस बत्तीस-कच्या पक्का किमाम हरी पत्ती-कत्री, बाबा जर्दा - पूना मसाला कलकत्ता वगैरे वगैरे असे शब्द मुंबईला पानपट्टी खिलविणाऱ्या भैय्याचे दरबारी आपण ऐकत असतो. मुंबैकर ऑफिसवाले, बँकबाबू पासून अगदी मंत्रालयातील किंवा कुठल्याही सरकारी आ.ल.या.तील कर्मचाऱ्यांचे तोंडी अगदी सहजगत्या हे शब्द फिरत असतात. वेळ असते दुपारी एक ते दीड वाजण्याची. प्रत्येकजण आपापला डबा खाऊन, लंच टाईम घेऊन ह्या पानवाल्यांचे मस्टर गाठत असतो.

इतरांची तोंडे रंगविणारा हा पानवाला भैय्या आपले काम मात्र C.L., P.L., S.L. शिवाय उन्हा-पावसात अव्याहत करत असलेला आपल्याला दिसेल. मी विचार करतो यांना कुठे मिळते हे ट्रेनिंग, त्यांची कुठे आहे उद्योग शाळा वा उद्योग केंद्र? काही, काही नाही. केवळ चिकाटी आणि आपल्या व्यवसायावर दृढ श्रद्धा. आहे का असा कोणी मराठी माणूस अशा चिकाटीने धंदा करणारा?

आजच्या विज्ञान युगात आणि तेही या संगणकाच्या लंकेत हा भैय्या आपल्या पानांचे हिशेब पटापट तोंडी करत असतो. मागील पानांचे पैसे, सुटे पैसे नसल्यास पुढील पानात वळते करून घेणे, कोण माणूस कुठे बसतो, कुठल्या प्रकारचे पान खातो, त्याला चुना-तंबाखु कमी अधिक कशा प्रमाणांत लागतो. ह्या सगळ्याचा 'बायोडाटा' त्याच्याकडे असतो. साधारणतः दुपारी १ वाजण्याच्या पूर्वी तो नित्यात्या गिऱ्हाईकांच्या पुड्या बांधून मार्किंग करून तयार ठेवत असतो.

गेली वीस-पंचवीस वर्षे मी हा माणूस पाहातोय पण त्याची तीच शरीरयष्टी, तेच छद्मी हास्य, तोच पेहराव व तीच मिठ्ठास वाणी.

वीस-पंचवीस वर्षांपूर्वीचे पानाचे दर १० पैसे, १५ पैसे, २० पैसे असे वाढत वाढत आत्तातर दोन रुपयांवर आलेले आहेत. सर्वसाधारण माणूस दिवसाला ४-५ तरी पाने खातो. शंभर-सव्वाशे गिऱ्हाइके जरी रोज मिळाली तरी रोजची आवक झाली हजार एक रुपये. यातला फायदा ३०-४० टक्के धरला तरी केवळ पानाच्या विक्रीतून रोजची प्राप्ती ३००-४०० रुपये!

शिवाय विडी काडी-सिगारेट ह्या आनुषंगित वस्तूंची विक्रीही साधारणपणे तेवढीच. म्हणजे महिन्याचे झाले ना किमान दहा-पंधरा हजार? ह्या पानाच्या धंद्याकडे डोळेझाक करून न चालता, धंद्यावर दृष्टी ठेऊन जर आपण उद्योग केले तरच आपण उद्योगी म्हणून पुढे येऊ नाही का? हे आपणच ठरवा.

❀ ❀



Marathi Pratishthan

# रेडिओ इलेक्ट्रिक इन्स्टिट्यूट ह्या 'कुटुंब'संस्थेच्या कुशल संचालिका शालिनीबाई मराठे

- **लक्ष्मण शंकर** (पृ.५२०), मुलुंड, मुंबई (फोन:५६८०१०४)

*गिरगांवातील रेडिओ इलेक्ट्रिक इन्स्टिट्यूट (REI) ही तांत्रिक शिक्षण देणारी भारतातील पहिली संस्था. मराठ्यांच्या तीन पिढ्यांनी ती गेली ६५ वर्षे जिद्दीने व कल्पकतेने जोपासली, वाढवली. शालिनीबाईंची या वाटचालीतील कर्तबगारी अतिशय मोलाची आहे.*

**शालिनीबाईंचे दीर दत्तात्रय हरी** १९३० मध्ये इलेक्ट्रिकल आणि मॅकेनिकल इंजिनियर (L.E.E. & L.M.E.) झाले. त्यांना नोकरीपेक्षा यंत्र-तंत्र विद्येची आवड. त्या हौसेपायी ते तांत्रिक दुरुस्तीची कामे करू लागले. यांतून आकारले एक वर्कशॉप. तांत्रिक विषय, इलेक्ट्रॉनिक्स यांवरची पुस्तके वाचून, त्यावर मनन-चिंतन करून ती क्लिष्ट माहिती आपल्या मित्र-मंडळींना सोप्या भाषेत ते शिकवीत. १९३४ साली त्यांनी खाजगी क्लासच सुरू केला. हीच आजची रेडिओ इलेक्ट्रिक इन्स्टिट्यूट.

इन्स्टिट्यूट चा नावलौकिक वाढला. तसा पसाराहि वाढू लागला. **शालिनीबाईंचे पति धुंडिराज हरी** (पृ.१३४) यांनीही आपली शाळेतली प्राचार्याची नोकरी सोडून बंधूंना मदत करायला सुरवात केली. ते गणितात B.A. व इंग्रजीत M.A. होते.

**१९४४ मधे धुंडिराज हरींचा विवाह झाला आणि शालिनीबाई मराठ्यांच्या घरात आल्या.** त्या सांगली संस्थानात मॅट्रिकला १ल्या आल्या होत्या. सायन्सची आवड म्हणून सायन्सचे शिक्षण चालू केले पण आईच्या आजारपणामुळे प्रॅक्टिकलला वेळ देणे शक्य होत नाही असे लक्षात येताच सायन्स सोडून आर्टस् ला गेल्या आणि गणित घेऊन मुंबई विद्यापीठाच्या बी. ए. झाल्या होत्या. त्याही रेडिओ इलेक्ट्रिक इन्स्टिट्यूट मधे गणित विषय शिकवू लागल्या.

याबरोबरच या वेगळ्या क्षेत्रांत स्वतः शिकायलाहि त्यांनी सुरवात केली. Radio Servicing & Radio Communication चा डिप्लोमा त्यांनी घेतला आणि British Institute of Radio Engineering च्या परिक्षेलाही त्या बसल्या. त्या A.M.I.E. च्या विद्यार्थ्यांनाही गणित विषय शिकवीत. संस्थेत पडेल ते काम त्या मनोभावे करीत असत. पण आपला घरकामा-व्यतिरिक्तचा



फावला वेळ त्यांनी वाचन केले आणि 'उद्यम' "Radio Servicing Magazine" मध्ये तांत्रिक विषयावर लेखन केले. ज्या वेळेस संस्थेत अध्यापकांची गरज भासे तेव्हा त्या शिकवीतही.

१९६६ साली मराठे बंधूंनी Herman Company (Germany) शी Collaboration केले आणि शालिनीताई कार्यानुभवासाठी जर्मनीला गेल्या. Germany मध्ये त्यांनी Selenium & Silicon Rectifier चे विशेष शिक्षण घेतले आणि Designing चे प्रशिक्षण घेऊन (1) Radio Problems Simplified, (2) Understanding Commercial Transistor Receiver Circuits, (3) Understanding Commercial Radio Circuits अशी तीन बहुमोल पुस्तके इंग्रजीतून लिहिली.

सरकारचे Department of Technical education तर्फे घेतल्या जाणाऱ्या परीक्षांच्या त्या बरीच वर्षे परीक्षक होत्या. Electronic Industrial Association च्या शालिनीबाई Managing Body वर सदस्या होत्या. सरकारच्या सिलॅबस कमिटीवर Certified level Electronics विषयाच्या त्या सदस्या होत्या. तांत्रिक शिक्षणाच्या क्षेत्रात बायकांचे प्रमाण फार थोडे असते. अशावेळी शालिनीबाईंचा ह्या विषयातला स्वतःच्या अनुभवाने समृद्ध असलेला सहभाग फार महत्वाचा. Indian Technical Education Society च्या त्या अध्यक्षाही होत्या.

शालिनीबाई संस्थेत अधिक लक्ष घालू लागल्या. संस्थेच्या व्यवहारांना एक नेटकेपण येऊ लागले. त्यांची स्त्रीसुलभ सूक्ष्म आणि चौकस नजर संस्थेच्या सगळ्या अंगोपांगावर फिरू लागली आणि संस्था आटोपशीर होते न होते तोच श्री. दत्तात्रय हरी मराठ्यांचे निधन झाले. (१९७२) पाठोपाठ तीन-चार वर्षांत श्री. धुंडीराज हरीही वारले. (१९७६) डळमळीत आर्थिक पायावर कसाबसा तोल सावरणारी त्या काळातल्या अग्रगण्य संस्थेची पूर्ण जबाबदारी शालिनीबाईंवर पडली. संस्थेची प्रशस्त जागा विकून येणारे पैसे व्याजी लावा आणि आरामात रहा असा सल्ला हितचिंतकांनी दिला असतानाही शालिनीबाईंनी आपले बौद्धिक बळ पणाला लावून संस्था चालवायचीच असा निर्धार केला.

दीरांच्या दोन्ही सुविद्य मुलांना स्वतःच्या नोकऱ्यांतच अधिक रस होता. **शालिनीबाईंचा मुलगा उमेश** (ज. १९५५) अद्याप शिकत होता. **मुलगी शीला** मोठी (जन्म १९५०). पण तिचे शिक्षण वेगळे होते - हॉटेल मॅनेजमेंटचा कोर्स करून ती 'ताज' मध्ये नोकरीला होती. जोगेश्वरीच्या कारखान्यांतले २५ कामगार, कंपन्यांशी झालेले करार, लोकांची देणी, सारे अगदी गळ्याशी आलेले होते. दुःख करायलाही उसंत नव्हती. शालिनीबाईंनी या सर्व परिस्थितीचा शांतपणे विचार केला आणि मनाशी काही निश्चित निर्णय घेऊन आत्मविश्वासाने सगळी सूत्रे हातात घेतली. तेही पतीच्या मृत्यूच्या १०व्या दिवशी!

शीलाला नोकरी सोडायला सांगून मदतीला घेतले. जोगेश्वरीचे वर्कशॉप गिरगांवात REI च्या जागेत आणले. तिथली जागा विकून देणी भागवली. दीरांच्या मुलांनाहि गिरगावातली अर्धी जागा देऊन त्यांची भागीदारी संपवली. REI व वर्कशॉपची पूर्ण मालकी शालिनीबाईंकडे आली. मुलीने REI वर लक्ष केंद्रित केले. काळानुरूप नवे नवे शिक्षणक्रम सुरू केले. शालिनीबाईंनी वर्कशॉपकडे




Marathe Pratishthan

अधिक लक्ष पुरवायचे ठरवले. डिझायनिंग, सेलिंग व पर्चेसिंग हे सारे त्यांनी कुशलतेने सांभाळले. लवकरच मुलगा आय.आय.टी. मधून इले. इंजिनिअरींग मध्ये बी. टेक. होऊन हाताशी आला. तो प्रामुख्याने वर्कशॉपची जबाबदारी संभाळू लागला. अंधेरीला जागा घेऊन १९७७-७८ मधे वर्कशॉप तिथे नेले. अलिकडे वसईलाहि मोठी जागा घेऊन कारखाना तिथेही चालू केला आहे. R.E.I. ची एक शाखाहि डोंबिवलीत १९८३ पासून सुरू केली आहे.

संस्थेच्या विद्यार्थ्यांना भरपूर प्रॅक्टिकल्स करता यावी म्हणून संस्थेची रेडिओ, इंजिनियरिंग, कंप्यूटर प्रत्येकासाठी स्वतंत्र व सुसज्ज प्रयोगशाला आहे. निरनिराळ्या विषयांचे अद्ययावत ज्ञान विद्यार्थ्यांना मिळावे म्हणून सुमारे २००० पुस्तकांचे ग्रंथालय आहे.

अध्यापनासाठी उच्चशिक्षित अध्यापक तर आहेतच, पण नामवंत तांत्रिक संस्थांतून वा उद्योग धंद्यातून त्या-त्या क्षेत्रांतील तज्ञांना आमंत्रित करून त्यांची व्याख्याने आयोजित केली जातात. संस्थेच्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवासाठी विविध कारखान्यातहि पाठवले जाते. संस्थेची मान्यता तर इतकी की ब्लू स्टार, सी.एम्.सी., अडवानी ऑर्लिकॉन्स यांसारख्या नावाजलेल्या कंपन्या त्यांच्या कर्मचाऱ्यांना या संस्थेत मायक्रोप्रोसेसर प्रशिक्षणासाठी पाठवतात. संस्थेत शिकून गेलेले अनेक विद्यार्थी आज देशात व देशाबाहेरहि नोकरीत वा उद्योगधंद्यात नावारूपाला आलेले आहेत.

आजच्या स्पर्धेच्या युगांत आपले अस्तित्व टिकवायचे असेल तर सतत अद्ययावत रहावे लागते हा मूलभूत विचार जाणीवपूर्वक स्वीकारला आणि त्यानुसार कटाक्षाने कार्यवाही करत राहिल्यानेच संस्थेच्या यशाची कमान सतत चढती-वाढती राहिली असा शालिनीबाईंचा विश्वास आहे. इलेक्ट्रीकल व इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रांत जसजसे बदल होत गेले तसतशी काळाची गरज ओळखून नवेनवे शिक्षणक्रम त्यांच्या संस्थेत सुरू करण्यात आले. सुरवातीला रेडियो दुरुस्ती व बांधणी, इलेक्ट्रिशियन, वायरमन, रेडिओ ऑफिसर असे कोर्सेस होते. तसेच A.M.I.E. परीक्षांचेहि वर्ग होते. १९४७ मधे डिपार्टमेंट ऑफ टेक्निकल एज्युकेशनच्या मान्यतेने डिप्लोमा इन ॲडव्हान्स रेडिओ कम्युनिकेशन हा कोर्स सुरू केला. (१९५२ नंतर तो काही अडचणीमुळे बंद केला.) १९७८ पासून इलेक्ट्रॉनिक्स टेक्निशियन, डिजिटल इलेक्ट्रॉनिक्स, मायक्रो प्रोसेसर्स यासारखे कोर्सेस सुरू केले. १९८० पासून मराठी, गुजराती व हिंदी या भाषांतून रेडिओ व टी.व्ही. चे शिक्षण देण्यास सुरवात केली. १९८३ पासून कलर टी.व्ही. चे शिक्षण देण्यास सुरवात केली. आता कॉम्प्युटरचे युग सुरू झाले आहे हे लक्षात घेऊन मायक्रोसॉफ्ट, नॉव्हेल यांसारख्या अग्रगण्य परदेशी कंपन्यांच्या सहकार्याने कॉम्प्युटर नेटवर्किंगपर्यंतचे निरनिराळे कोर्सेस चालू करण्यात आले आहेत. **शालिनीबाईंची सून (सौ. संजीवनी)** मुळांत टेक्स्टाईल इंजिनिअर. पण घरच्या व्यवसायाची गरज ओळखून कॉम्प्युटर सॉफ्टवेअरचे स्वतः शिक्षण घेऊन या विभागाची जबाबदारी हाताळीत आहे.

संस्था भक्कम पायावर उभी राहिली. तिचा नावलौकिक वाढला. १९८४ मधे संस्थेचा सुवर्णमहोत्सव साजरा झाला. शालिनीबाईंनीही वयाची साठी ओलांडली होती. (जन्म १९२२) मुलीचे लग्न होऊन तिच्याबरोबरच जावईही स्वतःची नोकरी सांभाळून REI च्या कामांत मदत करीत होते. मुलाचे लग्न होऊन सुविद्य सून घरात आली होती. तिनेही संस्थेच्या व्यापांत सक्रिय भाग घ्यायला सुरवात केली होती. मुलगा-सून, मुलगी-जावई ही नवी पिढी नव्यानव्या कल्पना योजनांनुसार हा सर्व व्याप समर्थपणे पेलतील या विश्वासाने शालिनीबाईंनी संस्थांचा कारभार त्यांच्या हाती सोपवून निवृत्ती स्वीकारली. त्यानंतर गेल्या १० वर्षांतली संस्थांची कामगिरी पाहिली तर त्यांचा हा विश्वास किती सार्थ होता हे लक्षात येईल.

शालिनीबाईंनी निवृत्तीनंतर अध्यात्ममार्ग स्वीकारायचे ठरविले. १९६६ साली जर्मनीमध्ये गेल्या असता ज्या बाईंकडे त्या रहात होत्या त्यांनी तिला गीता समजावून देण्यास शालिनीबाईंना सांगितले. त्यांना ते जमले नाही. याची लाज, खंत वाटली. हिंदुस्थानात परत आल्यावर गीता शिकायला सुरवात केली. तेव्हा स्वामी चिन्मयानंद त्यांच्या आयुष्यांत आले. अनेक ठिकाणी फिरून त्यांची शिबिरे अटेंड केली. तेव्हापासून अध्यात्माची ओढ लागली होती. ती निवृत्तीनंतर भागवण्याचे त्यांनी ठरविले.

१९८७ मध्ये वयाच्या ६५व्या वर्षी पवई, मुंबई येथील चिन्मय मिशनच्या सांदीपनी आश्रमात वेदान्ताचा दोन वर्षांचा रेसिडेन्शियल कोर्स पूर्ण केला. १९९१ साली हिमाचल प्रदेशांत सिद्धबारी येथे चिन्मय मिशन आश्रमात ६ महिने राहून काही उपनिषदांचे अध्ययन केले. १९९० पासून गुरुदेवांच्या आज्ञेनुसार पुण्यात राहून वेदांताचे वर्ग चालवतात. तसेच १८ अध्याय गीता, शंकराचार्यांचे इतर ग्रंथ यावर प्रवचने करतात.

शालिनीबाईंचे नाव अगदी यथार्थ आहे. त्या खरोखरच 'शालीन' आहेत. त्यांच्या यशाचे श्रेय त्या स्वतःकडे घ्यायला तयार नाहीत. संस्थेच्या संस्थापकांची पूर्वपुण्याई आणि सहकाऱ्यांचे परिश्रम यांमुळेच हे यश मिळवू शकले अशी 'इदं न मम' वृत्ती हा त्यांचा स्थायीभाव आहे. गीता येत नव्हती ती खंत मनाला लागल्यामुळेच की काय त्यांनी गीता खऱ्या अर्थाने आत्मसात केली. शानिलीबाई गीता केवळ 'शिकल्या'च नाहीत तर त्या गीता 'जगल्या' - जगत आहेत असे म्हणणे वावगे होणार नाही. ❀ ❀

### काय हा योगायोग!

१) अब्राहम लिंकन हे **१८४६** मध्ये काँग्रेसवर निवडले गेले. जॉन एफ कॅनेडी हे **१९४६** मध्ये काँग्रेसवर निवडले गेले.

२) अब्राहम लिंकन हे **१८६०** साली राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आले. जॉन एफ कॅनेडी हे **१९६०** साली राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आले.

३) लिंकन ह्यांच्या सचिवाचे नाव कॅनेडी होते तर कॅनेडी ह्यांच्या सचिवाचे नाव लिंकन होते.

४) दोघांचाही खून शुक्रवारी, डोक्यात गोळी लागून व त्यांच्या पत्नीच्या समोर झाला.

५) जॉन बूथ व ली ओसवाल्ड या दोघांही खुन्यांचा खून त्यांचेवर खुनाचा आरोप सिद्ध होण्यापूर्वीच झाला.

६) लिंकनचा खुनी जॉन बूथ ह्याचा जन्म **१८३९** साली झाला तर कॅनेडींचा खुनी ली ओसवाल्ड ह्याचा जन्म **१९३९** साली झाला.

७) लिंकन नंतरचे राष्ट्राध्यक्ष अँड्र्यू **जॉन्सन** त्यांचे जन्मसाल **१८०८** होते. कॅनेडी नंतरचे राष्ट्राध्यक्ष लिंडन **जॉन्सन** त्यांचे जन्मसाल **१९०८** होते.

**संकलक-सुरेश सखाराम** (पृ.३९९),
अध्यक्ष-मराठे प्रतिष्ठान



Marathe Pratishthan

# 'लेक पिअर्सिंग' म्हणजे काय? कशासाठी?

- **रमाकांत माधव विद्वांस** (पृ.६२३), माहीम, मुंबई (फोन : ४३२ ४८४०)

***मार्च १९९९ मध्ये कोयना धरणात पाण्याखाली भोक पाडून पाण्याचा प्रवाह वळवून वीजनिर्मिती सुरू करण्याचे एक बिकट काम आपण परदेशी तंत्रज्ञांच्या सहकार्याने पार पाडले. याला खूप प्रसिद्धीही मिळाली.***

***मात्र त्याआधी सुमारे ७-८ वर्षे आपलेच कुलबांधव रमाकांत माधव विद्वांस आणि त्यांचे दोन सहकारी यांनी परदेशी सल्ला न घेता हेच काम राजस्तानातील काली-सिंध नदीच्या डोहावर यशस्वीपणे केले होते हे वाचून आपल्याला नक्कीच अभिमान वाटेल.***

मार्च ९९ मध्ये कोयना प्रकल्पाच्या चौथ्या टप्प्याचे काम पूर्ण होऊन त्या टप्प्यातील विद्युत निर्मितीची सुरवात झाली. त्याला प्रसिद्धीसही खूप मिळाली. प्रसिद्धीचे कारण म्हणजे त्यात भारतात प्रथमच वापरलेले Lake Tapping किंवा Lake Piercing चे परदेशी तंत्रज्ञान होते. यासाठी निष्णात नॉर्वेजियन लोकांची मदत घेण्यात आली होती.

खरे पाहता भारतातील पहिले Lake Piercing चे काम हे १९९२ च्या जुलै महिन्यात राजस्थानातील काली सिंध नदीच्या डोहावर करण्यात आले. ते काम करणाऱ्या रॅपिड कॉर्ट्रॅक्टिंग कंपनीचे तांत्रिक सल्लागार मी व माझे सहाध्यायी श्री. शंकर रानडे व श्री. चंद्रदत्त नवलकर होतो. रॅपिड कॉर्ट्रॅक्टिंगकडे अशा कामाचा अनुभव नव्हता. Lake Piercing चे तंत्रज्ञान हे परदेशात खूप वापरात आलेले होते. नॉर्वेच्या नॉद्कन्सल्ट या एकाच सल्लागार कंपनीला या क्षेत्रात बरेच वर्षांचा अनुभव आहे. Lake Piercing चे काम अतिशय अवघड व धोकादायक असते. म्हणून आम्ही नॉद्कन्सल्ट ची मदत मिळविण्याचा प्रयत्न केला. परंतु आमच्या पत्रांना साधी पोच पण दिली नाही. त्यानंतर आम्ही तिघांनी हे तंत्रज्ञान स्वतः विकसित करण्याचा चंग बांधला. खूप वाचन केले. खूप विचार विनिमय केला. परिणामी, आमच्या मार्गदर्शनाखाली व आमच्या सल्ल्यानुसार व आमच्या योजनाबरहुकूम Lake Piercing चे काम यशस्वीरीत्या कोठलाही अपघात न होता पार पडले. हे तंत्रज्ञान आम्ही पूर्णपणे स्वतः, परदेशी मदत न घेता विकसित केले. याबद्दल आम्ही काही प्रमुख वर्तमानपत्रांना कळविले. पण लोकसत्ता सोडून आम्हाला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. लोकसत्तामध्ये सुद्धा जी बातमी आली त्यात पूर्णपणे चुकीचा उल्लेख होता. आम्हीही प्रसिद्धीसाठी हपापलेले नसल्याने त्याचा पाठपुरावा केला नाही. त्यामुळे कोयनाला Lake Piercing चे तंत्रज्ञान प्रथम वापरले गेले हा दावा आम्ही केलेल्या कामाच्या माहितीअभावे केला गेला असावा. असो.

आता Lake Piercing म्हणजे काय व कशासाठी ते पाहू. जलविद्युत परियोजना किंवा पाणीपुरवठा परियोजना यांत धरण बांधून नदीचे पाणी अडवले जाते व जलाशय निर्माण केला जातो. बोगद्याद्वारे व मोठ्या व्यासाच्या स्टील पाइपातून (पेनस्टॉक्समधून) हे पाणी पॉवरहाऊस मधील पाणचक्कीत (टरबाइन्स) सोडले जाते. पाणचक्कीला जोडलेल्या जनित्रामधे त्यायोगे विजनिर्मिती होते. कोयना प्रकल्पात साधारण १९९३ पासून वीज निर्मिती होत आहेच. पण आता या जलाशयातून आधी घेतले जात होते त्याच्या दुप्पट पाणी घेऊन, कमी वेळ पण दुप्पट वीजनिर्मिती करण्याची गरज काही तांत्रिक कारणामुळे निर्माण झाली. यासाठी कोयना जलाशयाच्या तळात भोक पाडून त्यातून नवीन बांधलेल्या अतिरिक्त बोगदे व पेनस्टॉक्स मधून नव्या पावरहाऊसमध्ये पाणी घेऊन वीजनिर्मिती करण्याची गरज होती. हे जलाशयाच्या तळात भोक पाडण्याचे काम Lake Piercing चे तंत्रज्ञान वापरून केले गेले.

जलाशयातील पाण्याची पातळी कमी करून व ज्या ठिकाणी असे भोक पाडायचे तो भाग उघडा करून हेच काम Lake Piercing चे तंत्रज्ञान न वापरता करता आले असते. पण यामध्ये पाण्याची पातळी उतरवल्यामुळे काही महिने, सध्या कोयना प्रकल्पात होत असलेली वीजनिर्मिती बंद झाली असती. सध्याच्या वीज टंचाईच्या परिस्थितीत हे शक्य नव्हते. त्यामुळे पाण्याची पातळी न उतरवता उभ्या पाण्यात असे भोक पाडण्यासाठी Lake Piercing चा प्रयोग करणे आवश्यक होते.

Lake Piercing हे नाव असे का पडले याचे कारण किनाऱ्यावरून बोगद्याची सुरवात करून तो बोगदा जलाशयाच्या पोटात उघडणे म्हणजे जलाशयाचा तळात Pierce करणे वा घुसणे.

जलाशय पावसाळ्यात तुडुंब भरतात. वीजनिर्मितीसाठी जसाजसा पाण्याचा वापर केला जातो तशीतशी जलाशयातील पाण्याची पातळी उतरत जाते. एका ठराविक पातळीपर्यंत हे पाणी वापरता येते - कारण बोगद्यापासून पाण्याचा प्रवाह निर्माण करण्यासाठी पाण्याची कमीत कमी पातळी ही बोगद्याच्या तोंडाच्या काही मीटर्स वरच लागते. त्याला Minimum Draw-down Level म्हणतात.

Lake Piercing च्या कामाची योजना करण्याआधी किनाऱ्याचा व किनाऱ्याजवळील भागाचे सर्वेक्षण (टोपोग्राफिक सर्व्हे) करावा लागतो. Lake Piercing चे भोक पाडण्यासाठी योग्य अशा २ वा ३ जागा शोधल्या जातात. त्या जागा व त्या आसपासच्या भागाचा अतिशय सखोल अभ्यास केला जातो. या अभ्यासात जमिनीच्या स्तरांच्या (Soil Strata) गुणदोषांचा आढावा घेतला जातो व कामाची योजना ठरविली जाते.

Lake Piercing चे काम किनाऱ्यावरून सुरू केले जाते. प्रथम किनाऱ्यावर एक विहीर खोदली जाते. विहिरीची खोली ही Lake Piercing च्या जागेच्या पातळीपेक्षा अधिक खोल असते. या विहिरीच्या तळातून आडवा बोगदा केला जातो. Lake Piercing च्या जागेजवळ पोहोचण्याआधी



Marathe Pratishthan

# विवाह सहाय्य

***हितगुजच्या वाचकांनी त्यांच्या कुटुंबातील अथवा नात्यांतील किंवा परिचयातील मुला-मुलींची माहिती या सदरांत प्रसिद्धीसाठी पाठवावी. बहुसंख्य वाचक हे कपिगोत्रीच असणार त्यामुळे 'कपिगोत्र' नसणाऱ्या मुला-मुलींची माहिती पाठवण्यात मराठ्यांच्या माहेरवाशिणी फार मोलाचे कार्य करू शकतील.***

***कुलबांधवांकडून आलेली माहिती खाली दिली आहे. इच्छुकांनी संबंधितांशी परस्पर संपर्क साधावा. जिथे पत्ता दिलेला नाही त्यांचे बाबतीत 'विवाह सहाय्य' असे लिहिलेले बंद पाकीट, ल. शं. मराठे, संपादक हितगुज, अ-२३, सुयोग सोसायटी, मुलुंड (पूर्व), मुंबई-४०० ०८१ या पत्यावर पाठवावे. ते संबंधितांकडे पोचवले जाईल. - संपादक.***

**क्र. १/१९९९ वर:** जितेंद्र अनंत लेले, बी. कॉम., एल. एल. बी., अलिबाग येथे वकिली. जन्म ४-३-७०, उंची ५'-६'', वर्ण गोरा, मंगळ आहे, पत्रिका हवी, रक्तगट O Rh +ve **अपेक्षा:** कोकणस्थ, सुंदर, किमान पदवीधर, अलिबागला रहाण्याची तयारी, नोकरी असल्यास उत्तम. **संपर्क:** अनिल गणेश (पृ.५५७), १०५, गगन विहार, पाटीलपाडा, कुळगांव (बदलापूर) पूर्व ४२१५०३. (फोन:९११-६९३३०१४)

**क्र. २/१९९९ वर:** प्रसाद पांडुरंग, आय्.टी.आय्. मॅकॅनिकल ड्राफ्ट्स्मन, कंम्प्युटर कॅड कोर्स (फर्स्ट क्लास), अंधेरीला खाजगी कंपनीत नोकरी, पगार-४५००. जन्म २०.१०.७३, उंची ५'-७'', रास-कर्क, गोत्र-कपि, वडील निवृत्त केंद्र सरकारी पेन्शनर, आर्थिक स्थिती उत्तम, स्वतःच्या मालकीचा फ्लॅट. मुलाला भाऊ-बहिण नाही. आई पण नाही. **अपेक्षा:** सुस्वभावी, घरात काम करणारी, कुळधर्म, कुळाचार पाळणारी. **संपर्क:** पांडुरंग महादेव (पृ.८८), १४ ब, विशाल अपार्टमेंट्स्, शंकर मंदिरासमोर, भाटीबंदर रस्ता, आगाशी, ता. वसई, जि. ठाणे-४०१३०१.

**क्र. ३/१९९९ वधू:** योगिनी प्रभाकर देशमुख, बी.एस्सी. (स्टॅटिस्टिक्स), पुण्यात कॉसमॉस को-बँकेत नोकरी. जन्म १३.३.१९६६, गहू वर्ण, उंची ५'-२'', मंगळ नाही, काश्यप गोत्र, राक्षस गण, आद्य नाडी, वृश्चिक रास, आई-वडील व मोठी एक बहिण (विवाहित). **अपेक्षा:** पुण्यातील कोणत्याही ब्राह्मण पोटशाखेतील, वय ३४-४०, **संपर्क:** प्रभाकर दिगंबर देशमुख, २६७, बुधवार पेठ, श्रीकृष्ण टॉकीजशेजारी, पुणे-४११००२. (सौ. नीलांबरी रमेश, पृ.२८० यांचेमार्फत माहिती प्राप्त)

**क्र. ४/१९९९ वधू:** बी.ए. इंग्लिश (डिस्टिंक्शन), पुण्यात जर्मन डिप्लोमा चालू, कंम्प्यूटर मल्टिमिडीया पूर्ण, त्याच संस्थेत नोकरी. टेबल टेनिस युनिव्हर्सिटी प्लेअर, गाणे, पेंटींग, वाचनाची आवड, गोत्र-कपि, रास-मकर, अंत्य नाडी, रक्तगट ओ आरएच पॉझिटिव्ह, उंची ५'-५'', जन्म २९.१०.१९७६, चष्मा नाही. मध्यम रंग व बांधा. आई गृहिणी, वडील इंजिनियर, स्वतःचा व्यवसाय हुबळी येथे. २ विवाहित बहिणी, १ भाऊ बी.ई. शिकत आहे. **अपेक्षा:** जन्म १९७० पूर्वी नसावा. कोकणस्थ, उंची किमान ५'-९''. मध्यम बांधा. इंजिनिअर, सी.ए., नेव्ही ऑफिसर. नोकरी वा व्यवसाय चालेल. **संपर्क:** क्र. ४/१९९९, द्वारा संपादक हितगुज.

**क्र. ५/१९९९ वधू:** बी.कॉम, डी.बी.एम्. बरोज वेलकम स्टेनो सेक्रेटरी, जन्म ११.९.१९६५, उंची ४'-१०'', रंग गोरा, गोत्र कपि, रास कुंभ, गण मनुष्य, रक्तगट ए आरएच निगेटिव्ह, वडील नाहीत. आई, १ भाऊ, १ बहिण. **अपेक्षा:** अनुरूप, शिक्षण, नोकरी, जागा हवी. लग्न साधे करण्याची इच्छा. **संपर्क:** क्र.५/१९९९, द्वारा संपादक, हितगुज

**क्र. ६/१९९९ वधू:** जन्म २७.१२.७२, बी.कॉम, एल.एल.बी. चालू, उंची ४'-१०'', रक्तगट ए आरएच पॉझिटिव्ह, वर्ण निमगोरा, सडपातळ, सामाजिक कार्याची आवड, नोकरीची खास आवड नाही. वडील गोव्यात बागायत शेती, दुकानदारी, सार्वजनिक कार्यकर्ते. **अपेक्षा:** धंदेवाला किंवा नोकरीवाला, मुंबई, पुणे, सांगली, मिरज इत्यादी गावी चालेल. **संपर्क:** क्र. ६/१९९९, द्वारा संपादक हितगुज.

**क्र. ७/१९९९ वधू:** जन्म ११.१२.७४, कॉम्प्युटर इंजिनिअर, उंची ४'-१०'', रक्तगट ए आरएच पॉझिटिव्ह, वर्ण गोरा, सुस्वरूप, प्रायव्हेट कंपनीत नोकरी गोव्यात. वडील गोव्यात बागायत शेती व दुकानदारी. सार्वजनिक कार्यकर्ते. **अपेक्षा:** शक्यतो कॉम्प्युटर क्षेत्रात, धंदा अगर नोकरी चालेल. भारताबाहेर जाण्याची मानसिक तयारी. **संपर्क:** क्र.७/१९९९, द्वारा संपादक हितगुज.

---

**लेक पिअर्सिंग** (मागील पानावरून)

बोगद्याची दिशा बदलून तो जवळजवळ १५ अंशांच्या कोनात वर नेला जातो. बोगद्याचे खोदकाम दगडात भोके पाडून, त्यात Explosive भरून व त्याचा स्फोट करून केले जाते. त्यानंतर खोदलेल्या भागात जरूरीप्रमाणे Supporting & Strengthening Treatment दिली जाते. शेवटचा स्फोट झाल्याबरोबर जलाशयाचे पाणी अतिवेगाने बोगद्यात व विहिरीत घुसते आणि Lake Piercing चा प्रसंग पूर्ण होतो. कोयना परियोजनेत या विहिरीमधून आधीच Power House ला जोडणाऱ्या बोगद्याचे काम झाले होते. त्यामुळे Lake Piercing झाल्याबरोबर पूर्ण योजना कार्यान्वित झाली.

Lake Piercing चा अजून एक महत्वाचा उपयोग म्हणजे निसर्ग निर्मित तलाव व नद्यांतील डोहांच्या पाण्याचा वापर. अशा तलावातील वा डोहातील पाणी वापरले गेले तर पावसाळ्यात त्याची आपोआप भरपाई होते. Lake Piercing करून असे पाणी सहजरित्या खालच्या पातळीवर नेता येते व तेथे त्याचा उपयोग वीज निर्मिती किंवा सिंचन इ. साठी होऊ शकतो.

**समांतर सुभाषिते**

Some people eat to live,
Most live to eat.
जगण्यासाठी खाणारे थोडे,
खाण्यासाठी जगणारेच जास्त!



Marathe Pratishthan

# सासू-सून : संसारातील शीतयुद्ध

- **गजानन भास्कर** (पृ.४२७), घाटकोपर, मुंबई (फोन : ५१६ ३९०७)

राणी एलिझाबेथ-डायना, इंदिरा गांधी-मनेका, ह्या बड्या घरापासून, बंगल्यामध्ये, ब्लॉकमध्ये, चाळीमध्ये, झोपडीमध्ये रहाणाऱ्या सर्व कुटुंबात सासू-सून संबंध हा एक अनोखा विषय आहे.

'सास और बाँस कभी अच्छे नही होते।' अशी हिंदीत म्हण आहे. उत्तर हिंदुस्थानात अजून जुनी कुटुंबव्यवस्ता व जुन्या परंपरेतील ऑफिस नीती प्रचलित आहे. पण आपल्याकडे आता 'सासुरवास' व 'बॉसिंग' हे इतिहासजमा झाले आहे. उलट सासूला सुनेच्या तालावर नाचावे लागते. तर ऑफिसर्सना - विशेषतः सरकारी, निमसरकारी, बँका, मोठ्या संस्था या ठिकाणी काम करणाऱ्या - युनियनच्या पुढाऱ्यांच्या दडपणाखाली काम करावे लागते. त्यामुळे पुष्कळ जण ऑफिसरचे पदच नाकारतात. वरिष्ठ-कनिष्ठ, सासू-सून यांच्या संबंधात अढी असते. अगदी साध्या गोष्टीत याची प्रचीती येते.

सुनेने घराची खूप स्वच्छता केली आणि कोणी त्याचे कौतुक केले की सासू कोपऱ्यातल्या राहिलेल्या जळमटाकडे लक्ष वेधणार. तर एखाद्या सासूने सुनेची त्याबद्दल प्रशंसा केली तर सून म्हणणार 'हे लोकांना दाखवायला नाटक. माझ्याशी नेहमी तेढीने वागतात.' आपण कितीही चांगला ड्राफ्ट लिहा, वरिष्ठ उगाचच त्यात बदल करणार, बॉस म्हणून.

अर्थात काही ठिकाणी वरिष्ठ-कनिष्ठ, सासू-सून संबंध चांगले असतात. चांगले वरिष्ठ असल्यांस आपणांस खूप शिकता येते. नोकरीत प्रगती होते तर सासू-सुनांच्या मनोमीलनाने घरात मोकळेपणा, आनंदी वातावरण रहाते. नातवंडांवर चांगले संस्कार होतात. म्हणून आता सासूला 'आई' म्हणण्याची पद्धत पडली आहे. खरी आई 'ए' आई तर सासू 'अहो' आई!

आमच्या ऑफिसमध्ये माझ्या हाताखाली एक गर्भश्रीमंत सिंधी मुलगी क्लार्क म्हणून काम करायची. तिचा मोठा फ्लॅट होता. ड्रायव्हर होता, नोकर-चाकर होते. ती रोज मर्सिडीज गाडीने ऑफिसला येत असे. मी तिला म्हणत असे, 'लिली तुम कायको सर्व्हिस करती है? क्यों ये बंधन लिया है?' ती मला म्हणाली,'मराठे साहेब, होम इज होम, ऑफिस इज स्वीट होम.' घरी राहिले तर उगीचच सासू-नणंदेशी फालतू कारणावरून वाद होतात. ऑफिसमध्ये सात तास छान वेळ जातो. मनःशांती मिळते. तिला ओव्हरटाईमला बसावे लागे. एके दिवशी सासूचा फोन आला - 'लिली अलमारीकी चावी मिलती नही.' लिली मला म्हणाली,'मराठे साहेब, ये सब बहाणा है, सास चेक करती है कि मैं सचमुच ओव्हरटाईम करती हूँ या बाहर घुमती हूँ.'

एकदा माझ्या खात्यातील जोशीबाईंचा फोन आला. मी जोशीबाईंना बोलावले, कारण फोन माझ्या केबिनमध्ये होता. त्यामुळे मला जोशीबाईंचे बोलणे ऐकू येत होते.

'काय म्हणतेस आई, तुला बरे नाही?' भेटायला रविवारी येऊ? नाही, मी आत्ताच येते. आमचे साहेब चांगले आहेत. ते मला ऑफिसमधून लवकर सोडतील. जोशीबाई मला विचारून ताबडतोब गेल्या.

दोन दिवसांनी जोशी बाईंना परत फोन आला. ज्या त्रासिक भाषेत त्या बोलत होत्या त्यावरून मला अंदाज आला की, पलिकडे सासू फोनवर असावी.

'काय म्हणताय, तुम्हाला बरं नाही? स्पेशालिस्टकडे जायला हवे? सासरे बाहेरगावी गेले आहेत. घरी दुसरे कोणी नाही? ....नाही, मला मुळीच जमणार नाही. आमचे क्लोजिंग चालू आहे. ओव्हरटाईम करावा लागतो. रजा मिळणार नाही. आमचे साहेब खडूस आहेत. - जोशीबाई.

मी त्यांना म्हणालो,'बाई, तुम्ही आताच गेलात तरी हरकत नाही. पण दोन दिवसांपूर्वी मी चांगला होतो आणि आता खडूस कसा झालो?'

महिला मंडळामध्ये, जेष्ठ नागरिक संघामध्ये व इतरत्र कौटुंबिक समस्यांवर चर्चा होतात. तेव्हा आढळून आले की ज्यांना फक्त मुली आहेत त्यांना तुलनेने कमी समस्या आहेत. या उलट ज्यांना मुलगे सुना आहेत त्यांना जास्त ताण-तणाव आहेत. मुलींची लग्ने करून दिली की, आई-वडील मोकळे. मुलीच्या सासरच्यांना (जावईसोडून) नावे ठेवायची हा मस्त विरंगुळा. असे म्हणतात,

'मातृप्रेम पुत्राचे जोवरी<br>
न तो अडकला विवाह बंधनी।<br>
मातृप्रेम कन्येचे अविरत<br>
जरी असो माहेरी, सासरी।।'

पण सुनासुद्धा काही ठिकाणी सासर घरी समरस होतात. त्यांच्या स्वभावामुळे, आर्थिक हातभारामुळे, कष्टामुळे, सासरकडील नणंदांची लग्ने, दिरांची शिक्षणे होतात. नातवंडांची देखभाल आजी आजोबा छान करतात. सून निश्चिंत मनाने नोकरी करू शकते. 'लक्ष्मी येता घरा, सावरतो घराचा डोलारा' असे दिसून येते. तर काही ठिकाणी 'सून येता घरा, उडाला पुरता बोजवारा.' असे म्हणण्याची पाळी येते. शेवटी हा प्रश्न सासू व सून दोघींच्याही सामंजस्याचा आहे, हे खरे.

***(सासर-माहेर, सास्वा-सुना यांचेमधील नातेसंबंधाच्या पारंपारिक कल्पना अलिकडे झपाट्याने बदलत आहेत. 'गभा'ना अभिप्रेत असलेले 'सास्वा-सुनां'मधले सामंजस्य अनेक कुटुंबात अलिकडे दिसून येते. याबाबतचे आपले अनुभव सास्वा व सुना दोघींनीही 'हितगुज'कडे प्रसिद्धीसाठी पाठवावे. इतरांना ते निश्चितच मार्गदर्शक होतील. - संपादक)***

**हसरे हितगुज**

**अजब व्युत्पत्ती**

सासू - **सा**रख्या **सू**चना<br>
सून - **सू**चना **न**को



Marathe Pratishthan

# मराठे प्रतिष्ठान - उद्योग प्रेरणा समिती

## उद्योजक-व्यावसायिकांसाठी प्रश्नावली

नाव : ____________________ वय : ________

पत्ता : ____________________

फोन : ________

शिक्षण : ____________________

एकूण अनुभव : ____________________

शिक्षणाशी संबंधित अनुभव : ____________________

सध्याचा व्यवसाय/उद्योग : ____________________

प्रस्तावित व्यवसाय/उद्योगाचे स्वरूप व जागा : ____________________

तुम्हास कोणकोणते सहाय्य हवे आहे? : ____________________

एकूण भांडवलाची गरज : ____________________

भांडवल उभारणीसाठी काय प्रयत्न केलेत ? : ____________________

या व्यवसायात आपली काय गुंतवणुक असेल? : ____________________

व्यवसायाचे स्वरूप काय राहील? (नको ते खोडावे.) खाजगी मालकी/भागीदारी/खाजगी लिमिटेड कंपनी :

**(एखाद्या बाबतीत जागा पुरली नाही तर स्वतंत्र कागद जोडावा.)**



Marathe Pratishthan

### चुकीची दुरुस्ती

हितगुज मार्च ९९ अंकात २६ जानेवारी १९९९ रोजी पुण्यात झालेल्या प्रतिष्ठानच्या २०व्या वर्धापन दिन समारंभाचा वृत्तांत प्रसिद्ध केला आहे. या प्रसंगी देणग्या देणाऱ्यांची नांवे प्रसिद्ध केली आहेत.

त्यामध्ये **विष्णु रामचंद्र मराठे यांनी दिलेल्या रु.५०० देणगीचा उल्लेख करायचा राहून गेला आहे.** तसेच **सौ. निर्मला श्रीपाद मराठे यांनी दिलेल्या देणगीची रक्कम रु.५०० छापली आहे. ती रु.५०० नसून रु.२०० आहे** याचीहि नोंद घ्यावी.

या चुकांबद्दल दिलगीर आहोत. - **संपादक.**

## या अंकात


१. **प्रतिष्ठानच्या अनौपचारिक शाखा** ........................पृ.१
अध्यक्ष सुरेशभाऊंचे डोंबिवली मेळाव्यातील भाषण.

२. **असा बनला आपला लोगो** .............................. पृ.२
राजा मराठे

३. **अणुराख, किरणोत्सार इत्यादि** ............................पृ.४
डॉ. सुरेंद्रनाथ गणेश

४. **सर्दी-पडसे-खोकला** .......................................पृ.५
डॉ. शरद दत्तात्रय

५. **मप्रचे सांगलीतील वधू-वर माहिती केंद्र** .................पृ.५
सौ. गायत्री गोविंद लेले

६. **वसंत गौरव-८ मे १९९९** ..................................पृ.६
विनायक केशव

७. **मधुमतीवरील कारवाई** .......................................पृ.८
कै. गजानन अभ्यंकर

८. **येरे येरे पावसा (कविता)** ..................................पृ.८
प्रीता करमरकर

९. **श्रद्धांजली** ......................................................पृ.९
स्वाती गजानन अभ्यंकर

१०. **पानवाला** .......................................................पृ.९
वामन गणेश

११. **कुशल संचालिका शालिनीबाई मराठे** .................. पृ.१०
लक्ष्मण शंकर

१२. **काय हा योगायोग!** ...................................... पृ.११
संकलक - सुरेश सखाराम

१३. **लेक पिअर्सिंग म्हणजे काय? कशासाठी?** ......... पृ.१२
रमाकांत माधव विद्वांस

१४. **सासू-सून : संसारातील शीतयुद्ध** ..................... पृ.१४
गजानन भास्कर

याशिवाय **प्रतिष्ठान वृत्त** (पृ.२-४), **सभासद वृत्त** (पृ.६), **खुषीपत्र** (पृ.१), **प्रतिसाद** (पृ.१), **विवाह सहाय्य** (पृ.१३), **समांतर सुभाषिते** (पृ.१३) आणि **हसरे हितगुज** (पृ.१४) ही नेहमीची सदरे.


**बुक पोस्ट**

प्रति

**मराठे प्रतिष्ठान**
मराठे उद्योग भवन, आप्पासाहेब मराठे मार्ग,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.
(टे. नं. ४३०२४५३)

Marathe Pratishthan